www.lokrakshanay.com  epaper.lokrakshanay.com  dainiklokrakshanay@gmail.com  +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक ३४ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, रविवार, ०९ जून २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## थोडक्यात

### कळंबा कारागृहात मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपीचा खून; पाच बंदी ताब्यात

● कोल्हापूर, विशाल पाटील :

मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपीचा कळंबा कारागृहात खून केल्याप्रकरणी जुना राजवाडा पोलिसांनी शुक्रवारी पाच न्यायालयीन बंदींना ताब्यात घेतले. कारागृहातील न्यायालयीन बंदी प्रतीक ऊर्फ पिल्या सुरेश पाटील, दीपक नेताजी खोत, संदीप शंकर चव्हाण, ऋतुराज विनायक इनामदार आणि सौरभ विकास सिद्ध अशी त्यांची नावे आहेत. या



सर्वांना शनिवारी कोर्टासमोर हजर केले जाणार आहे. या पाच जणांना ताब्यात घेण्यासाठी जुना राजवाडा पोलिसांनी संबंधित न्यायालयाकडे पत्रव्यवहार केला होता. खून प्रकरणात पाच जण संशयित असल्याने त्याचा ताबा मिळावा, अशी मागणी पत्रव्यवहारात केली होती. शुक्रवारी ही मागणी मान्य झाल्याने संशयितांना ताब्यात घेतल्याचे जुना राजवाडा पोलिस ठाण्याचे निरीक्षक संजीवकुमार झाडे यांनी सांगितले.

पान २ वर

### दहा मिनिटांच्या पावसाने राष्ट्रीय महामार्गाची झाली बिकट अवस्था; वाहतूक पोलिसांनी केले खड्डे भरण्याचे काम



● वसई, दिगंबर जाधव :

वसई विरार मध्येही मान्सून दाखल झाला आहे. शनिवारी पहाटे अवघ्या दहा मिनिटं पडलेल्या पावसात मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर बिकट परिस्थिती निर्माण झाली होती. जागोजागी पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहतुकीवर परिणाम होऊन वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली होती. वसई पूर्वेच्या भागातून मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग गेला आहे. सद्यस्थितीत या महामार्गावर प्राधिकरणाकडून कॉंक्रिटीकरण करण्याचे काम सुरू आहे. परंतु त्याचे नियोजन नसल्याने जागो जागी खड्ड्यांची समस्या, रस्त्याची उंच सखल स्थिती कायम आहे. पान २ वर

## बाप्पा निघाले अमेरिकेला..! बदलापूरातून तब्बल ८० हजार इकोफ्रेंडली मूर्ती परदेशात रवाना



● ठाणे, रोहित जैसवाल :

आनंदाचा, उत्साहाचा आणि जल्लोषाचा उत्सव म्हणजेच गणोशोत्सव. गणेशोत्सवाला अद्याप तीन महिने जरी बाकी असले तरी मूर्तिकार मात्र फार आधीपासूनच तयारीला लागतात. भारताबरोबरच परदेशातही गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. यासाठीच परदेशात असलेल्या भारतीयांनाही बाप्पाचा पाहुणचार करता यावा यासाठी बदलापूरचे तरूण उद्योजकाने तब्बल 80 हजार गणेशमूर्ती परदेशात पाठवले आहेत. पान २ वर

## वेसावेतील सागरी किनारा क्षेत्रात अनधिकृत बांधकामे; दुय्यम अभियंता सोमेश शिंदेंच निलंबन

● मुंबई, यश सावंत :

मुंबईतील के पश्चिम विभाग अंतर्गत वेसावे (वर्सोवा) येथे सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन परिसरामध्ये अनधिकृत बांधकामांकडे कानाडोळा करणे, वरिष्ठांनी वारंवार सूचना करूनही त्यांचे निष्कासन न करणे, कामकाजातील इतर नियमित बाबींमध्ये देखील निष्काळजीपणा केल्याप्रकरणी के पश्चिम विभागातील दुय्यम अभियंता सोमेश शिंदे यांना निलंबित करण्यात आले आहे. तर पदनिर्देशित अधिकारी स्वप्नील कोळेकर यांची देखील बदली करण्यात आलीय. महानगरपालिका आयुक्तांच्या समक्ष बैठकीस उपस्थित राहण्याची सूचना दिल्यानंतरही गैरहजर राहून निर्देशांचे उल्लंघन केल्याबद्दल सोमेश शिंदे यांना कारणे दाखवा नोटीसही बजावण्यात आलीय.



■ प्रशासकीय कामकाज आणि जबाबदाऱ्या यामध्ये कोणीही बेजबाबदारपणा, दुर्लक्ष आणि निष्काळजीपणा करू नये, अन्यथा त्यांना देखील कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा अप्रत्यक्ष इशाराच या प्रकरणातून महानगरपालिका आयुक्त आणि प्रशासक भूषण गगराणी यांनी दिलाय. दरम्यान, वेसावेतील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासाठी महानगरपालिका आयुक्तांच्या मंजुरीने विशेष पथकाची नेमणूक देखील करण्यात आलीय.

■ 'के' पश्चिम विभागात २०२२ पासून कार्यरत असलेले दुय्यम अभियंता सोमेश शिंदे यांच्याकडे प्रभाग क्रमांक ५९,६० आणि ६३ यांचा कार्यभार सोपवण्यात आला होता. प्रभाग क्रमांक ५९ आणि ६३ यामध्ये अनधिकृत बांधकामे, मोठ्या प्रमाणात अनधिकृत फेरफार, मुख्या जमिनीवरील बांधकामे, वेसावे येथे सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन परिसरात व दलदलीच्या जमिनीवर अनाधिकृत बांधकामांविषयी प्रशासनाकडे मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होत होत्या. सह आयुक्त (परिमंडळ ४) विश्वास शंकरवार आणि के पश्चिम विभागाचे सहायक आयुक्त डॉ. पृथ्वीराज चौहान यांनी या सर्व तक्रारींची दखल घेऊन त्यावर कारवाई करण्यासाठी सोमेश शिंदे यांना वारंवार सूचना केल्या होत्या. सोमेश यांना प्रत्यक्ष बोलावून संबंधित ठिकाणी पाहणी करून कारवाई करण्याचे देखील निर्देश देण्यात आले. वेसावे भागातील अधिकृत बांधकामांविषयी महानगरपालिका आयुक्त आणि अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त यांना सविस्तर माहिती देऊन निष्कासनाची कारवाई दिनांक ३ जून २०२४ रोजी नियोजित होती. पान २ वर

## कधी कधी पराभव होतो, एकमेकांच्या डोक्यावर खापर फोडू नका; देवेंद्र फडणवसींचा महायुतीच्या नेत्यांना सल्ला

● मुंबई, विशाल कारंडे :

लोकसभा निवडणुकीत महायुतीला मोठा फटका बसल्यानंतर त्यावर सर्वच पक्षांकडून आढावा घेण्याचं काम सुरू आहे. भाजपनेही आपल्या आमदारांची बैठक बोलवून लोकसभेतील कामगिरीचा आढावा घेतला. स्थानिक पातळीवर महायुतीमध्ये काही ठिकाणी समन्वयाचा अभाव दिसल्याचं सांगत तो दूर केला जाईल असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितलं. तसेच कधीकधी पराभव होतो, पण एकमेकांच्या डोक्यावर खापर फोडू नका असा सल्लाही फडणवीसांनी भाजपच्या आणि महायुतीच्या नेत्यांना दिला.

लोकसभा निकालाच्या पार्श्वभूमीवर भाजपची महत्त्वपूर्ण बैठक दादर येथील वसंतस्मृती पक्ष



कार्यालयात झाली. त्यावेळी ते बोलत होते. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, यशाला अनेक बाप असतात, पण अपयशाची जबाबदारी कुणीही घेत नाही. कधी कधी पराभव होतो पण एकमेकांच्या डोक्यावर खापर फोडू नका. यावेळी आपल्याला काही ठिकाणी समन्वयाचा अभाव दिसला. आपली मदत मित्र पक्षाला झाली, त्यांची आपल्याला झाली. आपल्या लोकांनी प्रामाणिकपणे मित्र पक्षांना मदत केली. पण नॅरेटिव्ह तयार करण्याचे काम कोणीही करू नये. मी आपल्या प्रवक्त्यांना देखील बोललो आहे. एकमेकाला सोबत घेऊन जाणे हे महत्वाचे आहे. आता वेगवेगळी विश्लेषण करू नका.

### जोपर्यंत महायुतीचा झेंडा फडकत नाही तोपर्यंत शांत बसणार नाही

“ येत्या विधानसभा निवडणुकीत महायुती म्हणून तीनही पक्ष एकत्रितपणे सामोरं जातील आणि जिंकतीलही असा विश्वास देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केला. लोकसभा निवडणूक संपली त्याच्या दुसऱ्या दिवसापासून कामाला लागलो, जोपर्यंत महायुतीचा झेंडा फडकत नाही तोपर्यंत मी शांत बसणार नाही असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. महाराष्ट्रातील पॉलिटिकल अर्थमॅटीकमुळे आपण कमी पडलो असं सांगत देवेंद्र फडणवीसांनी आकडेवारी सांगितली.

## यूसीसी, लोकसंख्या नियंत्रण कायद्याबाबत संघाची नवीन सरकारकडून अपेक्षा कायम

● नागपूर, नितीन देवळेकर :



लोकसभा निवडणुकीत भाजपला बहुमत मिळू न शकल्याने मित्रपक्षांचा टेकू घेत सरकार स्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. एकीकडे राजकीय हालचाली सुरू असताना दुसरीकडे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पदाधिकाऱ्यांमध्येदेखील मंथन सुरू आहे. मागील १० वर्षात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने संघाच्या अजेंड्यावरील अनेक बाबींची पूर्तता केली. मात्र नवीन सरकारने समान नागरी कायदा व लोकसंख्या नियंत्रण कायद्याबाबत ठोस पावले उचलावी व त्यात तडजोड करू नये, अशी संघाची अपेक्षा आहे. मात्र आघाडी सरकारमुळे भाजप नेत्यांना ही अपेक्षापूर्ती करता येईल का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

२०१४ साली भाजपचे सरकार स्थापन होण्याअगोदरपासूनच संघाकडून समान नागरी कायदा व लोकसंख्या नियंत्रण कायद्याचा मुद्दा विविध मंचांवर उपस्थित करण्यात आला होता. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी विजयादशमीच्या कार्यक्रमातून जाहीरपणे लोकसंख्येच्या असमतोलावर चिंता व्यक्त करत कायदा करण्याची भूमिका मांडली होती. तर सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी नागपुरात मार्च महिन्यातच अखिल भारतीय प्रतिनिधी सभेदरम्यान समान नागरी कायदा देशात लागू व्हावा, असे स्पष्ट केले होते. पान २ वर

## आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी महापालिका प्रशासनाकडून नियोजनाला सुरुवात

● नाशिक, सचिन कदम :

लोकसभा निवडणुकीची धामधूम संपल्यानंतर महापालिका प्रशासनाकडून आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीबाबतचे नियोजन सुरू करण्यात आले असून शुक्रवारी आयुक्त तथा प्रशासनाधिकारी डॉ. अशोक करंजकर यांच्यासह अधिकाऱ्यांनी विविध पार्किंगच्या ठिकाणांची, तसेच रस्त्यांची पाहणी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त (शहर) प्रदीप चौधरी, नगररचनाचे उपसंचालक हर्षल बाविस्कर, शहर अभियंता संजय अग्रवाल, इंजिनिअर संदेश शिंदे, इंजिनिअर जितेंद्र पाटोळे आदी सहभागी झाले होते.

डोंगरे वसतीगृह, मिरची पॉईंटची जागा, पांझरापोळ, पेठरोडवरील जागा, पेठरोडवरील स्टेडियम, कुसुमाग्रज उद्यान ते बाळासाहेब ठाकरे स्मृति संग्रहालय, रामवाडी पुलाला समांवर




पशूवैद्यकीय हॉस्पिटलजवळील जागांची पाहणी करण्यात आली. त्यात कोणत्या जागांवर पार्किंग होवू शकते याबाबत तपासणी करण्यात आली. सिंहस्थासाठी बाहेरून येणाऱ्या भाविकांसाठी पार्किंगची मोठी जागा लागणार आहे. भारतातून येणाऱ्या भाविकांची संख्या पाहता जागा अधिक लागू शकते, त्यामुळे जेथे जेथे मोकळी जागा अधिक मिळू शकते, त्याच ठिकाणांची पाहणी करण्यात आली. पान २ वर

## विद्यार्थ्यांचेच मराठीकडे 'नीट' दुर्लक्ष; मराठीतील वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशाबाबत साशंकता

● पुणे, अभिजित येरल्लू :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०अंतर्गत वैद्यकीय आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रम मराठीतून उपलब्ध करण्याचे प्रस्तावित आहे. मात्र, वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेत (नीट) विद्यार्थी मराठी माध्यमातून परीक्षा देण्याचा पर्याय नाकारत असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. वैद्यकीय अभ्यासक्रम मराठीतून उपलब्ध झाला, तरी किती विद्यार्थी त्याला पसंती देतील का, याबाबत आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मराठी माध्यमातून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचा टक्का घटत असताना अन्य काही प्रादेशिक भाषांतून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे किंवा संख्या टिकून असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मराठीच्या पर्यायाकडे पाठ फिरवणे चिंतेचा विषय आहे.




■ राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणातर्फे (एनटीए) वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या नीट परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत विविध प्रादेशिक भाषांतून परीक्षा देण्याचा पर्याय उपलब्ध असतो. त्यात मराठी माध्यमाचाही समावेश आहे. मात्र, २०१९मध्ये ३१ हजार २३९ विद्यार्थ्यांनी मराठी माध्यमातून परीक्षा दिली होती. त्यानंतर गेल्या काही वर्षात मराठीचा टक्का घसरता असल्याचे चित्र आहे. पान २ वर

सन २०२०मध्ये ६ हजार २५८, २०२१मध्ये २ हजार ९१३, २०२२मध्ये २ हजार ३६८, २०२३मध्ये १ हजार ८३३ विद्यार्थ्यांनी मराठी माध्यमातून परीक्षा दिली होती. यंदा केवळ १ हजार ७५९ विद्यार्थ्यांनीच मराठी माध्यमाचा पर्याय निवडला. एकीकडे मराठीतून परीक्षा देणाऱ्यांचा टक्का घसरत असला, तरी बंगाली, हिंदी, तमिळ, उर्दू अशा काही प्रादेशिक भाषांतून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचा टक्का वाढतो आहे किंवा विद्यार्थिसंख्या टिकून असल्याचे आकडेवारीतून दिसून येते. उदाहरणार्थ, २०१९मध्ये हिंदी माध्यमातून १ लाख ७९ हजार ८५७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. २०२०मध्ये २ लाख ४ हजार ३९९, २०२१मध्ये २ लाख २८ हजार ६४१, २०२२मध्ये २ लाख ५८ हजार ८२७, २०२३मध्ये २ लाख ७६ हजार १८०, तर यंदाच्या परीक्षेत ३ लाख ५७ हजार ९०८ विद्यार्थ्यांनी हिंदी माध्यमाला पसंती दिली.

## लवादांवर विशिष्ट गटांचे नियंत्रण नसेल याची काळजी घ्यावी लागेल, सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांचे प्रतिपादन

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

केवळ लवाद संस्था स्थापन करणे पुरेसे नाही तर ही तंटा निवारण केंद्र एका विशिष्ट गटाद्वारे नियंत्रित केली जाणार नाहीत याचीही खबरदारी आम्हाला घ्यावी लागेल, असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी म्हटले आहे. ते ब्रिटनमधील सर्वोच्च न्यायालयात बोलत होते. भारतासारख्या देशांनी व्यावसायिक लवादाला प्रोत्साहन देण्याची तसेच लवादाला संस्थात्मक रूप देण्याची वेळ आली आहे. जे 'ग्लोबल साऊथ' ची लवाद परंपरा पुढे नेतील. आफ्रिका, आशिया व लॅटिन अमेरिकेत वसलेले, विकसनशील, कमी विकसित किंवा अविकसित म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देशांसाठी ग्लोबल साऊथ ही संज्ञा वापरली जाते.



■ भारतातील न्यायालयांवर खटल्यांचा जास्त भार आहे, उच्च न्यायालयांनी २०२३ मध्ये २१.५ लाख खटले निकाली काढले व जिल्हा न्यायालयांनी २०२३ मध्ये ४.४७ कोटी खटले निकाली काढले. भारतातील लोक आपल्या न्यायप्रणालीवर किती विश्वास ठेवतात हे या आकडेवारीवरून दिसून येते. कोणताही खटला छोटा-मोठा नसतो या सूत्रावर आपली न्यायव्यवस्था काम करते.

■ न्यायालयात जाणाऱ्या प्रत्येक पीडित व्यक्तीला दिलासा मिळण्याचा अधिकार आहे. भारतात न्यायालये आपली घटनात्मक जबाबदारी पार पाडत आहेत. परंतु, लवाद ही तंटा सोडविण्याची अधिकाधिक स्वीकारार्ह पद्धत बनत असल्याने तोडग्यासाठी प्रत्येक प्रकरण न्यायालयात आणण्याची गरज नक्कीच नाही. अलीकडच्या काळात भारतात आंतरराष्ट्रीय लवाद केंद्र स्थापन झाली आहेत आणि त्यामधील खटल्यांचा ओघ हळूहळू वाढला आहे. पान २ वर

## विधानसभेला कोकणात सर्व जागा जिंकणार - खासदार सुनील तटकरे

● अलिबाग, भावना जैन :

रायगड लोकसभा मतदारसंघात अजित पवार गटाच्या सुनील तटकरे यांनी उद्धवसेनेच्या अनंत गीते यांचा पराभव करून विजय मिळवला. तटकरे हे सलग दुसऱ्यांदा खासदार म्हणून संसदेत रायगडचे प्रतिनिधित्व करणार आहेत. महायुतीमधील सर्व घटक पक्ष आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी घेतलेली मेहनत, विकासाच्या मुद्द्यावर लढवलेली निवडणूक याला इथल्या जनतेने साथ दिली. याबद्दल मी रायगड, रत्नागिरीमधील जनतेचा ऋणी आहे. त्यांचे ऋण मी कधीच विसरणार नाही.



आमच्या पक्षाने राज्यात चार जागांवर निवडणूक लढवली होती. रायगडमध्ये आम्हाला यश मिळाले आहे. तीन ठिकाणी अपयश आले आहे. याबाबत आत्मपरीक्षण करू. महायुतीला कोकणात मोठे यश मिळाले आहे. केवळ लोकसभेपुरता नाही तर आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या माध्यमातून कोकणात सर्व जागा जिंकून आणण्याचा निर्धार आहे. त्यानुसार काम करण्यात येणार आहे. देशभरात कॉंग्रेसला यावेळी निश्चित यश मिळाले आहे. कारण यावेळी सर्वपक्ष नरेंद्र मोदी यांच्या विरोधात एकत्र आले होते. तरी देशातील जनतेने त्यांना पुन्हा संधी दिली आहे. पान २ वर

# ग्रामीण भागात पारंपारिक जुन्या पद्धतीची जागा घेतली आधुनिक ट्रॅक्टर मशागतीने! नांगर झाले कालबाह्य!

● मुरबाड - ज्याप्रमाणे जग बदलत आहे त्याप्रमाणे मनुष्याच्या निगडित असलेल्या सर्व गोष्टी बदलून सर्वच ठिकाणी मनुष्याचे असलेले अनेक पारंपारिक व्यवसाय करत असतील किंवा याबद्दल असलेल्या काही परंपरा असतील या सर्व कालांतराने बदलत चाललेल्या आहेत याला मानवाची उत्क्रांती म्हणावा की चूक म्हणावा हा न कळणारा भाग आहे. त्यामुळे ग्रामीण भागात पारंपरिक जुन्या पद्धतीची जागा आधुनिक ट्रॅक्टर मशागतीने घेतली आहे. त्यामुळे शेतकरी नांगर कालबाह्य होताना दिसत आहे त्याची जागा आता सर्वत्र ट्रॅक्टरने घेतली आहे. त्यामुळे यापूर्वी नांगर बनवण्यासाठी शेतकरी वर्गाला एक ते दीड महिना लागत असायचा परंतु आता आधुनिक पद्धतीने नांगर ऐवजी झटपट मशागतीने काम करणारा ट्रॅक्टर पुढे आला आहे.

मानवाला शेतीसाठी लागणाऱ्या निगडित बाबींमध्ये सर्वात मोठी गरज ही शेती आहे.शेतीमध्ये कृषीमध्ये अनेक नवीन क्रांती झालेली आहेत त्यामध्ये शेती संशोधन यात मोठा बदल होऊन आता आधुनिक युगाकडे मनुष्याने झेप घेतली असताना शेतीला लागणाऱ्या अनेक संसाधने यांची जागा आता मशीनने घेतलेली आहे.

ज्याप्रमाणे आता शेतीमध्ये शेती करत असताना भरपूर प्रमाणात संशोधनची उपयोग होताना दिसत आहे अनेक ठिकाणी शेतीमध्ये पारंपारिक शेत उखलणी साठी शेतकऱ्याचे सर्वात मोठे व बलरामाचे आयुध म्हटले जाणारे नांगर आता





विलुप्त होताना दिसत आहे. नांगर म्हटला की त्या जोडीला सुंदर अशा बैलांची जोडी व त्या बैलांच्या जोडीला असलेला पारंपारिक शेतकरी यांचं नातं अगदी घट्ट पाहायला मिळत होते परंतु आता मात्र अशा प्रकारचे चित्र दिसत नाही त्यासाठी शेतकऱ्याने आता कामासाठी मिळत नसलेल्या मनुष्यबळाच्या अभावी देखील शेतकऱ्याने सरळ सरळ पारंपारिक शेतीसाठी लागणाऱ्या साधनांना दूर करून मशीनचा वापर करताना दिसत आहेत नांगर शेत उखलणीला लागत असलेला आता शेतकऱ्याच्या खांद्यावर न दिसता त्या ठिकाणी ट्रॅक्टरने जागा घेऊन ट्रॅक्टर वरती शेतकरी दिसत नाही. त्यामुळे शेतकरी बांधावरती बसून ट्रॅक्टरचा आवाज धूर व चकरा बघत आहे यात पारंपारिक अंदाज व आनंद दिसून येत नाही परंतु शेती कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्याला करायचे आहे या मनसुब्याने शेतकरी आता सर्रास प्रमाणे नांगरणीसाठी ट्रॅक्टर बोलावत आहे व तासाला एक हजार ते अकराशे रुपये मोजून एकटा शेतकरी दूर बांधावर बसून शेती करताना दिसत आहे त्याचप्रमाणे शेतीसाठी लागणारे सेंद्रिय खत सोडून अनेक रासायनिक खताकडे शेतकरी वळाल्याने शेतीच्या मशागतीमध्ये देखील फरक जाणवत आहे या पारंपारिक असलेल्या सेंद्रिय शेतीकडे शेतकरी वळेल का हे पहावे लागेल,,,असे चित्र दिसून येत आहे.

# केडीएमसी आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी केली नालेसफाईची पाहणी

## नालेसफाई त्वरीत करण्याबाबत कंत्राटदारांना दिले सक्त निर्देश

● कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी डोंबिवलीतील नालेसफाईची आज पाहणी केली आणि आढळुन आलेल्या त्रुटींबाबत मॅन्युअली आणि यंत्राद्वारे नालेसफाई त्वरेने करणेबाबत कंत्राटदारांना सक्त निर्देश दिले. येत्या आठवड्याभरात पुन्हा पाहणी करुन नालेसफाई व्यवस्थित झाली आहे, याची खातरजमा केली जाईल अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी दिली.

एमआयडीसी परिसरातील नालेसफाई एमआयडीसी व महापालिका यांचेकडून करणे जरुरीचे आहे. सध्या ही नालेसफाई महापालिकेकडून सुरु आहे, नाल्यांचे बळकटीकरण करणेबाबत एमआयडीसीला कळविण्यात आले आहे. या नाल्यांमध्ये अनेकवेळा नागरीकांकडून कचरा टाकला जातो, त्यामुळे नाले प्रवाहित होण्यास अडथळा निर्माण होतो. यासाठी नाल्यांमध्ये कचरा टाकणा-या लोकांवर दंड लावण्याबाबतचे निर्देश संबंधित स्वच्छता अधिका-यांना दिले असल्याची माहिती यावेळी महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी दिली.

महापालिका क्षेत्रात 97 कि.मी. लांबीचे 95 मोठे नाले असून 350 कि.मी. लांबीचे



छोटे नाले (गटार) आहेत. आज महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी डोंबिवली एमआयडीसी परिसरातील कावेरी चौक येथील नाला, अभिनव विद्यालया जवळील नाला, डोंबिवली (पूर्व) रेल्वे स्थानका जवळील स्ट्रॉम वॉटर ड्रेनेज, आयरे-भोपर रस्त्यावरील नाला, जुनी डोंबिवली रेती बंदर येथील नाला इ. नाल्यांची पाहणी केली. त्याचप्रमाणे डी. एफ. सी. सी. आय. एल. यांचे मार्फत सुरू असलेल्या लोहमार्गाच्या कामांमध्ये महानगरपालिकेतर्फे सुचविलेल्या रस्ते, गटारे या कामाच्या सद्यस्थितीची पाहणी करून सदरची कामे ,सी डी वर्क त्वरित करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

यावेळी शहर अभियंता अनिता परदेशी, उपायुक्त रमेश मिसाळ, कार्यकारी अभियंता घनश्याम नवांगुळ, मनोज सांगळे, सहा.आयुक्त हेमा मुंबरकर, संजयकुमार कुमावत, मुख्य स्वच्छता अधिकारी वसंत देगलुरकर, इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# नवी मुंबईच्या जैवविविधतेत भर घालणा-या ५ हजाराहून अधिक देशी वृक्षरोपांची लागवड

● नवी मुंबई - नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने 5 जून रोजी जागतिक पर्यावरण दिन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार व्यापक प्रमाणात लोकसहभाग घेऊन मोठया प्रमाणात वृक्षलागवड करुन साजरा करण्यात आला. आयुक्तांनी केलेल्या आवाहनास अनुसरून विद्यार्थी, महिला, युवक, प्रौढ व ज्येष्ठ नागरिक अशा सर्वच निसर्गप्रेमी नवी मुंबईकर नागरिकांनी आठही विभागांतील वृक्षारोपण व स्वच्छता कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला.

या दिवशी विविध ठिकाणी 5 हजाराहून अधिक स्थानिक देशी प्रजातींच्या वृक्षरोपांची लागवड करण्यात आली. त्याचप्रमाणे महानगरपालिकेने केलेल्या जाहीर आवाहनास अनुसरून 150 हून अधिक संस्था व व्यक्ती यांनी उद्यान विभागाशी संपर्क साधून अर्ज करीत वृक्षरोपे तसेच वृक्षारोपणासाठी योग्य जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. या मागणीनुसार साधारणत: 12 हजार देशी वृक्षरोपांचे वाटप करण्यात आले.

यामध्ये विशेषत्वाने नेरूळ विभागात नेरूळ पोलीस स्टेशन समोरील मोकळया जागेत बांबूच्या 375 झाडांची लागवड करण्यात आली. तसेच ज्वेल ऑफ नवी मुंबई येथे 2500 बांबूची व 250 जांभूळ झाडांची लागवड करण्यात आली आहे.

बेलापूर पामबीच येथे 250 बांबूची लागवड करण्यात आली असून तुर्भे - सानपाडा विभागात



संवेदना उद्यान, सेक्टर 10 येथे 65 देशी प्रजातींची करंज, ताम्हण, बहोनिया, एलोस्निया, बेलपत्र अशी झाडे लावण्यात आली आहेत.

तुर्भे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी 500 हून अधिक इतक्या मोठ्या संख्येने आकाशनिंब, पिंपळ, वड, गुलमोहर, आवळा अशा पानाफुलांनी बहरणा-या मोठ्या झाडांची लागवड करण्यात आली असून निसर्ग उद्यान, कोपरखैरणे येथे प्रामुख्याने 500 आंब्याची झाडे लावण्यात आली आहेत.

सुनील गावस्कर मैदान, सेक्टर 2, बेलापूर येथे बकुळ ताम्हण इ. 40 झाडांची लागवड करण्यात आली असून सेंट्रल पार्क, घणसोली येथे बकुळ, कडूनिंब, पिंपळ, अर्जुन, आंबा, पारिजातक, चाफा, टॅबोबिया, कांचन, करंज अशा विविध प्रकारच्या 65 झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले आहे.

# महायुती आणि महाविकास आघाडीत बिघाडी?

● नवी मुंबई : कोकण व मुंबई पदवीधर मतदारसंघासह मुंबई शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी शुक्रवारी भाजप व उद्धवसेनेने जोरदार शक्तिप्रदर्शन केले. दोन्ही पक्षांचे पदाधिकारी समोरासमोर येताच जोरदार घोषणाबाजी केल्यामुळे तणावाची स्थिती निर्माण झाली होती. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत तीन मतदारसंघांसाठी एकूण ५२ अर्ज दाखल झाले असून, महायुती व महाविकास आघाडीमध्ये बिघाडी झाल्याचे चित्र दिसत आहे.

कोकण पदवीधर मतदारसंघासाठी भाजपकडून निरंजन डावखरे, मुंबई पदवीधरसाठी किरण शेलार व मुंबई शिक्षक मतदारसंघासाठी शिवनाथ दराडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. भाजपने यावेळी जोरदार शक्तिप्रदर्शन केले. अर्ज भरण्याच्या वेळी मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, ज्ञानेश्वर म्हात्रे, किसन कथोरे, संजय केळकर, संजीव नाईक, संदीप नाईक यांच्यासह इतर नेते उपस्थित होते.

उद्धव ठाकरे गटाचे किशोर जैन यांनीही अर्ज सादर केला. कोकण भवन परिसरात भाजप व उद्धवसेनेच्या कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते समोरासमोर येताच जोरदार घोषणाबाजी केली.

उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत कोकण पदवीधर मतदारसंघासाठी २२ अर्ज दाखल झाले. महाविकास आघाडीमधील काँग्रेस व शरद पवार गट, उद्धवसेनेने उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. महायुतीतील भाजप, शिंदेसेनेने उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. मुंबई पदवीधर मतदारसंघामध्ये १० अर्ज दाखल झाले असून, त्यात उद्धवसेना, शिंदेसेना, भाजपच्या उमेदवारांचा समावेश आहे. मुंबई शिक्षक मतदारसंघासाठी २० अर्ज दाखल झाले आहेत. यात उद्धवसेना, समाजवादी रिपब्लिकन पार्टी, अजित पवार गट, काँग्रेस, शिंदेसेनेच्या उमेदवारांचा समावेश आहे.

राज्यातील लोकसभा निवडणुकीतील पराभवाच्या धक्क्यातून सावरत नाही तोच विधान परिषदेच्या मुंबई शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत भाजपमध्ये बंडखोरी झाली आहे.

# ठाणे जिल्ह्यात पाणी कपातीची शक्यता

● ठाणे : ठाणे जिल्ह्याला पाणीपुरवठा करणाऱ्या बारवी धरणातील आणि आंध्रा धरणातील पाणीसाठा आता हळूहळू कमी होऊ लागला असून सद्यस्थितीत बारवी धरणात अवघे २७.४३ टक्के तर आंध्रा धरणात २९.९४ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे तीन टक्के हा पाणीसाठा कमी आहे. या दोन्ही धरणातील पाणीसाठा १५ जुलै पर्यंत पुरेल अशी माहिती पाणीपुरवठा विभागातर्फे देण्यात आली आहे. असे असले तरीही पावसाची अद्याप कुठलीही चिन्हे नसल्याने पाणी साठ्याचे नियोजन करण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यात काही अंशी पाणी कपात लागू होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



ठाणे जिल्ह्यातील नागरी वसाहती तसेच औद्योगिक वसाहतींना मुरबाड तालुक्यातील एमआयडीसीच्या बारवी धरणातून आणि पुणे जिल्ह्यातील टाटा कंपनीच्या आंध्रा धरणातून पाणी पुरवठा केला जातो. यापैकी बारवी धरणाची एकूण पाणी पातळी क्षमता ही ३३८.८४ दशलक्ष इतकी आहे. तर आंध्रा धरणाची एकूण पाणी पातळी क्षमता ३३९.१४ दशलक्ष इतकी आहे. या दोन्ही धरणांच्या पाणी पातळीत सद्यस्थितीत घट होऊ लागली आहे. सद्यस्थितीत बारवी धरणात एकूण पाणीसाठ्याच्या तुलनेत ९२.९५ दशलक्ष म्हजणेच २७.४३ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. तर आंध्रा धरणात सद्यस्थितीत १०१.५५ दशलक्ष म्हणजेच २९.९४ टक्के इतका पाणीसाठा उपलब्ध आहे.

मागील वर्षी ७ जून रोजी बारवी धरणात २९.७० टक्के तर आंध्रा धरणात ३२.४७ टक्के इतका पाणीसाठा होता. गेल्यावर्षीच्या तुलनेत या दोन्ही धरणांच्या पाणीसाठ्यात सुमारे तीन टक्क्यांनी घट झाली आहे. जिल्हा प्रशासन तसेच पाणीपुरवठा विभाग, पाटबंधारे विभाग जिल्ह्यातील मुख्य धरणांच्या पाणीसाठ्याचा आढावा घेत असतात. अशाचप्रकारे जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील मुख्य धरणांतील पाणी साठ्याचा आढावा घेऊन त्यातील पाणी साठ्याची आकडेवारी जाहीर केली आहे.

जिल्ह्याला अधिकचा पाणीपुरवठा व्हावा यासाठी काळू, शाई, कुशीवली ही धरणे प्रस्तावित असली तरी या धरणांच्या उभारणीबाबत प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडून पाठ पुरावा होताना दिसत नाही. यामुळे जिल्ह्याला पाणीपुरवठा करणाऱ्या बारवी आणि आंध्रा धरणाची पाणी पातळी कमी झाल्यास संपूर्ण जिल्ह्यावर पाणी कपातीची टांगती तलवार असते. जिल्ह्याला सुमारे १५ जुलै पर्यंत पुरेल इतका पाणीसाठा असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागातर्फे देण्यात आली आहे. असे असले तरीही पावसाची अद्याप कुठलीही चिन्हे नसल्याने संपूर्ण जिल्ह्यात काही अंशी पाणी कपातीची शक्यता नाकारता येत नाही.

# नितीन कंपनी पूलाखालील उद्यान आता कचराभूमी, चालण्यासाठी उद्यानात येणारे नागरिक हैराण

● ठाणे : पूर्व द्रुतगती महामार्गावरील नितीन कंपनी पुलाखाली बेकायदा वाहने उभी राहू नये. तसेच नागरिकांना चालणे, व्यायामासाठी जागा उपलब्ध व्हावी यासाठी सुमारे सात वर्षांपूर्वी ठाणे महापालिकेने नितीन कंपनी ते कॅडबरी जंक्शन पर्यंत उद्यान उभारले आहे. या उद्यानामुळे परिसरातील जेष्ठ नागरिक, क्रीडापटू येत असत. परंतु महापालिकेच्या दुर्लक्षामुळे आता हे उद्यान 'डम्पिंग'चा भाग झाल्याचे चित्र आहे. मार्गरोधक, बंद पडलेली सिग्नल यंत्रणा, कारवाई केलेले फलक अशा विविध वस्तू येथे साठविल्या जात आहे. भंगार वाहने, महापालिकेची वाहने देखील येथेच उभी असतात. त्यामुळे एकेकाळी हिरवाईने नटलेला हा परिसर आता कचराभूमी ठरू लागल्याचे चित्र आहे.

पूर्व द्रुतगती महामार्गावरील नितीन कंपनी ते कॅडबरी कंपनी उड्डाणपूलाखाली पूर्वी अनधिकृतरित्या शेकडो दुचाकी, कार, अवजड वाहने उभी करण्यात येत होती. तसेच या वाहनांच्या मागे गर्दुल्ले दारू किंवा अमली पदार्थांची नशा करत होते. त्यामुळे परिसराची रया निघून गेली होती. तसेच महिला सुरक्षेचा प्रश्न देखील ऐरणीवर आला होता. हा प्रकार रोखण्यासाठी ठाणे महापालिकेने २०१७ मध्ये 'पीपीपी' तत्त्वावर या भागाचा विकास करण्यास सुरुवात केली होती. महापालिकेने या पूलाखाली सायकल ट्रॅक, चालण्यासाठी जॉगिंग ट्रॅक, लहान मुलांसाठी खेळण्याचे साहित्य, दोन्ही



बाजूंनी रोपांची हिरवळ अशा सुविधा निर्माण केल्या होत्या. त्यामुळे या परिसराचा अक्षरश: कायापालट झाला होता.


पाचपाखाडी, नितीन कंपनी, कॅडबरी, खोपट भागात वास्तव्य करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना या ठिकाणी विरंगुळ्यासाठी हक्काची जागा उपलब्ध झाली होती. येथे

> ■ गेल्या अनेक महिन्यांपासून उड्डाणपूलाखालील जागा भंगार साहित्यांनी व्यापली आहे. त्यामुळे चालणे देखील कठीण झाले आहे. पूर्वी हा परिसर सुस्थितीत होता. महापालिकेने येथे लक्ष देणे आवश्यक आहे. अन्यथा परिसरात घाणीचे साम्राज्य निर्माण होईल.
>
> **– संदेश जिमन, रहिवासी, लुईसवाडी**

जवळपास कुठेही उद्यान अथवा मोठी बाग नव्हती. त्यामुळे नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात होते. उड्डाण पुलाच्या प्रत्येक खांबावर निसर्ग संवर्धन आणि पर्यावरण रक्षणाविषयी सुविचार आणि घोषवाक्ये लिहिलेली होती. रात्रीच्या वेळी विविध रंगांची रोषणाई केली जात होती. त्यामुळे या रंगातून हा परिसर उजळून निघत होता. परंतु महापालिकेच्या दुर्लक्षामुळे या उद्यानाची अवस्था अत्यंत वाईट झाली आहे.

पुलाखाली महापालिकेने बिघाड झालेल्या सिग्नल यंत्रणा ठेवल्या आहेत. उद्यानाखालील सायकल ट्रॅक देखील तोडण्यात आले आहे. उद्यानाखाली काही पत्र्यांचे निवारे बांधण्यात आले आहे. त्यामुळे उद्यानात चालण्यासाठी येणाऱ्या नागरिकांची अडवणूक होत आहे. तसेच महापालिकेने कारवाई केलेल्या जाहिरातींचे फलक, प्लास्टिकचे तुटलेल्या अवस्थेतील मार्गावरोधक, भंगात दुचाकी आणि मोटारी ठेवल्या आहेत. लाकडी बांबूचा खच पडलेला आहे. काही उद्योग देखील या उद्यानात सुरू झाले आहे. जाहिरात फलकांना लावले जाणारे लोखंडी खांब येथे जोडले जात आहेत. त्यामुळे उद्यानाचा वापर खासगी कंपन्यांकडूनही बेकायदेशीरपणे सुरू असल्याचे चित्र आहे. या उद्यानाची अवस्था वाईट झाल्याने चालण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. उद्यानाचे बकालीकरण रोखा अशी मागणी येथील नागरिकांकडून केली जात आहे. याबाबत ठाणे महापालिकेचे वरिष्ठ उद्यान अधीक्षक केदार जाधव यांना संपर्क साधला असता, त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही.

# कार्तिक आर्यनच्या कारमध्ये उंदीर घुसले, लाखो रुपयांचा खर्च



कार्तिक आर्यन सध्या त्याचा आगामी चित्रपट 'चंदू चॅम्पियन' च्या प्रमोशनमध्ये व्यग्र आहे. हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आपल्या दमदार अभिनयासाठी लोकप्रिय असलेल्या कार्तिकला लक्झरी गाड्यांची खूप आवड आहे. त्याच्याकडे कोट्यवधी रुपये किमतीच्या गाड्या आहेत, यापैकी एका गाडीचा किस्सा त्याने सांगितला आहे.

२०११ मध्ये 'प्यार का पंचनामा' मधून करिअरची सुरुवात करणारा कार्तिक आत्तापर्यंत अनेक चित्रपटांमध्ये झळकला आहे. त्याचा 'भूल भुलैया २' हा चित्रपट २०२२ मध्ये रिलीज झाला होता. करोना नंतरच्या काळात सिनेमागृहे पुन्हा उघडल्यानंतर जे मोजकेच चित्रपट हिट झाले होते, त्यापैकी एक कार्तिकचा हा सिनेमा होता. हा चित्रपट ब्लॉकबस्टर झाल्यानंतर, टी-सीरीजचे मालक भुषण कुमार यांनी कार्तिक आर्यनला ४.७ कोटी रुपयांची मॅक्लारेन जीटी कार भेट दिली होती, त्याच कारशी संबंधित हा किस्सा आहे.

कार्तिकला भुषण कुमार यांनी ही कार भेट केल्यावर त्याने ती काही काळ चालवली होती, मग ती गॅरेजमध्ये पार्क केली होती. 'द लल्लनटॉप'ला दिलेल्या मुलाखतीत कार्तिक म्हणाला, "मी ही कार गॅरेजमध्ये पार्क केली होती, पण तिचे मॅट्स उंदरांनी कुरतडले, त्यामुळे मी बराच काळ ती कार वापरू शकलो नाही. मी दुसरी कार वापरत होतो. मॅक्लारेन जीटी कारमधील कुरतडलेले मॅट्स दुरुस्त करून घेण्यासाठी मला लाखो रुपये मोजावे लागले होते."

भुषण कुमार यांनी कार्तिकला भेट दिलेली मॅक्लारेन जीटी ही या ब्रँडची भारतातील पहिली कार होती. ही केशरी रंगाची कार आहे. ही एक सुपर कार आहे. या कारचा ताशी वेग ३२६.७ किलोमीटर आहे. ती ३.१ सेकंदात एका किमीवरून १०० किमी वेग गाठू शकते. कार्तिकने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर या कारचे बरेच फोटो शेअर केले आहेत.

'भूल भुलैया २' आधी कार्तिक आणि भुषण यांनी पहिल्यांदा 'सोनू के टीटू की स्वीटी' या हिट चित्रपटात एकत्र काम केलं होतं. हा चित्रपट २०१८ मध्ये आला होता. 'भूल भुलैया २' च्या यशानंतर त्यांनी क्रिती सेनॉन व कार्तिकबरोबर 'शेहजादा' बनवला, पण हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर कमाल दाखवू शकला नाही. कार्तिक पुढे कबीर खानच्या 'चंदू चॅम्पियन'मध्ये दिसणार आहे. हा चित्रपट १४ जुनला रिलीज होतोय. तसेच तो या वर्षाच्या अखेरीस 'भूल भुलैया ३' मध्ये भुषण कुमारबरोबर काम करत आहे.

# रशीद खानने रचला इतिहास, टी-२० वर्ल्डकपमध्ये 'ही' कामगिरी करणारा ठरला पहिला कर्णधार

टी-२० विश्वचषक २०२४ च्या मध्ये अफगाणिस्तान संघाने बलाढ्य न्यूझीलंड संघाचा पराभव करत मोठा उलटफेर केला. अफगाणिस्तानने न्यूझीलंडचा ८४ धावांच्या मोठ्या फरकाने पराभव करत सर्वांनाच चकित केले. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासात अफगाणिस्तानचा न्यूझीलंडविरुद्धचा हा पहिला विजय ठरला. कर्णधार रशीद खानने या ऐतिहासिक विजयात महत्त्वाची भूमिका बजावत इतिहास रचला. रशीद या कामगिरीसह मोठी कामगिरी करणारा टी-२० मधील पहिला कर्णधार ठरला आहे.

टी-२० विश्वचषकातील १४ व्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानने २० षटकांत ६ गडी गमावून १५९ धावा केल्या होत्या, त्यानंतर न्यूझीलंडचा संघ ७५ धावांत गारद झाला. टी-२० विश्वचषकात अफगाणिस्तानने पहिल्यांदाच न्यूझीलंडचा पराभव केला आहे. एकीकडे रशीदने ४ विकेट घेतल्या, तर दुसरीकडे फजलहक फारुकीनेही ४ विकेट घेण्यात यश मिळविले. गोलंदाजांशिवाय अफगाणिस्तानच्या फलंदाजांनीही शानदार फलंदाजी केली, रहमानउल्ला गुरबाजने ५६ चेंडूंत ५ चौकार आणि ५ षटकारांच्या मदतीने ८० धावा केल्या, तर इब्राहिम झद्रानने ४१ चेंडूंत ३ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ४४ धावा केल्या. या दोघांच्या भागीदारीने अफगाणिस्तानने चांगली धावसंख्या उभारली.

कर्णधार रशीद खानने भेदक गोलंदाजी करत



न्यूझीलंडविरुद्ध टी-२० मध्ये पहिला विजय नोंदवला. या सामन्यात अफगाणिस्तानचा कर्णधार रशीद खानने आपल्या उत्कृष्ट गोलंदाजीने १७ वर्ष जुना विक्रम मोडीत काढला. सामन्यादरम्यान, रशीदने ४ षटकांत केवळ १७ धावा देत चार महत्त्वपूर्ण विकेट घेतल्या आणि टी-२० विश्वचषकात सर्वोत्तम गोलंदाजी करणारा पहिला कर्णधार ठरला.


रशीदने न्यूझीलंडविरूद्धच्या सामन्यात १७ धावा देत ४ विकेट्स घेत न्यूझीलंडचा माजी कर्णधार डॅनियल व्हिटोरीचा विक्रम मोडला आहे. रशीदने किवी संघाच्या कर्णधाराचा विक्रम त्याच्या संघाविरूद्ध मोडला आहे. न्यूझीलंडच्या दिग्गज फिरकीपटूने २००७ मध्ये झालेल्या टी-२० विश्वचषकाच्या पहिल्याच सत्रात भारताविरुद्ध २० धावांत चार विकेट घेतल्या होत्या. आता या यादीत रशीद खानचे नाव पहिल्या क्रमांकावर आले आहे.

# राहुल द्रविड, अजित आगरकर यांची बाबासाहेब आंबेडकरांना अमेरिकेत वाहिली आदरांजली !

भारतीय संघाने टी २० विश्वचषक स्पर्धेत आयर्लंडवर विजय मिळवला. आता भारताचा पुढचा सामना पारंपरिक कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी होणार आहे. यानंतर काहीश्या रिलॅक्स मूडमध्ये असलेले टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड आणि निवड समितीचे प्रमुख अजित आगरकर यांनी भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना न्यूयॉर्कमध्ये आदरांजली वाहिली.

अजित आगरकर आणि राहुल द्रविड या दोघांनीही बाबासाहेब आंबेडकरांना आदरांजली वाहिली. कोलंबिया विद्यापीठातले या दोघांचे फोटो व्हायरल होत आहेत. विशाल मिश्रा नावाच्या एका नेटकऱ्याने हे फोटो पोस्ट केले आहेत.





द्रविड आणि आगरकर या दोघांनीही बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला अभिवादन केलं आणि आदर व्यक्त केला अशा ओळी विशाल मिश्रा यांनी लिहिल्या आहेत. या दोघांचाही हा फोटो व्हायरल होतो आहे. राहुल द्रविडने डेनिम कलरचा टीशर्ट घातल्याचं दिसतं आहे. तर अजित आगरकरने टीशर्ट आणि जॅकेट घातल्याचं या फोटोंत दिसतं आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला अभिवादन केल्यानंतर या दोघांनीही त्यासमोर उभं राहात फोटो काढले आहेत. जे चांगलेच व्हायरल झाले आहेत. या दोघांचाच कोलंबिया विद्यापीठाबाहेरचा फोटोही पोस्ट करण्यात आला आहे. यात राहुल द्रविड अजित आगरकरच्या खांद्यावर हात ठेवून उभा आहे असं दिसतं आहे.

राहुल द्रविड निवृत्त होणार

या टी २० विश्वचषक स्पर्धेनंतर राहुल द्रविड टीम इंडियाबरोबर असणार नाही. त्याने मुख्य प्रशिक्षकाच्या जबाबदारीतून स्वतःला मुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. नोव्हेंबर २०२१ मध्ये राहुल द्रविड टीम इंडियाचा कोच झाला होता. त्याने रवी शास्त्रींकडून या पदाची सूत्रं हाती घेतली होती. भारताने द्रविडच्या कार्यकाळात १७ पैकी १४ टी २० मालिका जिंकल्या आहेत. तसंच १४ पैकी १० वन डे मालिका आणि ८ पैकी ६ कसोटी मालिका भारतीय संघाने जिंकल्या आहेत.

रोहित शर्मा भावूक

राहुल द्रविडच्या निवृत्तीच्या निर्णयामुळे रोहित शर्मा भावूक झाला. रोहित म्हणाला, "राहुल पहिला आंतरराष्ट्रीय कर्णधार होता. आम्ही त्याला खेळताना पाहिलं आहे. गेल्या काही वर्षांमध्ये त्याने संघासाठी बरंच काम केलं आहे. राहुल बरोबर असताना आम्ही जवळपास सर्व स्पर्धांमध्ये विजय मिळवला आहे. जिंकण्यासाठी काय करायचं? हे आम्हाला त्याने शिकवलं. त्याला निरोप देताना मला खूप वाईट वाटणार आहे." असं रोहित शर्माने म्हटलंय.

## दिनविशेष

**घटना**

२००७: बांगलादेशातील चितगावमध्ये भूस्खलनामुळे १३० लोक ठार झाले.

२००६: फुटबॉल विश्वकप १८वी फुटबॉल विश्वकप स्पर्धा जर्मनीच्या म्युनिक शहरात सुरू झाली.

२००१: भारताच्या लिॲंडर पेस व महेश भूपतीने फ्रेन्च टेनिस स्पर्धेच्या पुरुष दुहेरी गटाचे विजेतेपद मिळवले.

१९९७ : सुखोई- ३० के ही रशियन बनावटीची विमाने भारतीय हवाई दलात दाखल.

१९७५: ब्रिटनमधील लोकसभेच्या (House of Commons) कामकाजाचे दूरचित्रवाणीवरुन थेट प्रसारण सुरू झाले.

१९७४: सोविएत रशिया आणि पोर्तुगाल यांच्यात राजनैतिक संबंध पुन्हा प्रस्थापित झाले.

**जन्म**

१९८५ : सोनम कपूर अभिनेत्री

१९८१: अनुष्का शंकर भारतीय इंग्लिश सतार वादक आणि संगीतकार १९७७ : अमिशा पटेल भारतीय अभिनेत्री

१९४९ : किरण बेदी - भारतातील पहिल्या महिला आय. पी. एस. अधिकारी

१९३१ : नंदिनी सत्पथी - भारतीय लेखक व राजकारणी (निधन: ४ ऑगस्ट २००६)

१९१२ : वसंत देसाई - संगीतकार (निधन: २२ डिसेंबर १९७५)

१८४५: गिल्बर्ट इलियट मरे- क्यंनमाँड भारताचे ३६वे गव्हर्नर जनरल (निधन : १ मार्च १९१४)

**निधन**

६८: नीरो - रोमन सम्राट (जन्म: १५ डिसेंबर ३७)

२०२२ : अस्लम आझाद भारतीय राजकारणी, बिहारचे आमदार (जन्म: १२ डिसेंबर १९४८)

२०२२: रेकंदर नागेश्वर राव भारतीय अभिनेते आणि चिकित्सक पद्मश्री, संगीत नाटक अकादमी पुरस्कार

२०११: एम. एफ. हुसेन - भारतीय चित्रकार व दिग्दर्शक - पद्म विभूषण, पद्म भूषण, पद्मश्री, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार (जन्म: १७ सप्टेंबर १९१५)

१९९५ : एन. जी. रंगा - स्वातंत्र्यसैनिक आणि शेतकरी चळवळीतील नेते (जन्म: ७ नोव्हेंबर १९००)

१९९३ : सत्येन बोस - बंगाली आणि हिंदी चित्रपट दिगदर्शक आणि पटकथा लेखक (जन्म: २२ जानेवारी १९२६)

१९८८ : गणेश भास्कर अभ्यंकर अभिनेते

१९८२: मिर्झा नासीर अहमद - भारतीय- पाकिस्तानी धर्मगुरु (जन्म: १६ नोव्हेंबर १९०९)

# मेडिटेरेनियन आहार महिलांच्या आरोग्यासाठी फायदेशीरआहे का?

दररोजच्या धावपळीच्या आयुष्यात आपण आरोग्याकडे लक्ष देत नाही, पण उत्तम आहार आरोग्यासाठी फायदेशीर असतो. तुम्ही मेडिटेरेनियन आहाराविषयी ऐकले आहे का? मेडिटेरेनियन आहार वजन कमी करण्यासह चांगले आरोग्य राखण्यास मदत करतात. आज आपण तज्ज्ञांच्या हवाल्याने या विषयी जाणून घेऊ या.

बंगळुरू येथील ॲस्टर महिला व बाल रुग्णालयाच्या आहारतज्ज्ञ वीणा व्ही. सांगतात, "मेडिटेरेनियन आहारामध्ये फळे, भाज्या, धान्ये आणि शेंगा यांसारखे पदार्थ खाण्यावर भरपूर भर दिला जातो. या पदार्थांवर कमीत कमी प्रक्रिया केली जाते आणि हे पदार्थ हंगामी, ताजे आणि स्थानिक पातळीवर पिकवले जातात. ऑलिव्ह ऑईल फॅट्सचा प्रमुख स्त्रोत असतो."

वीणा व्ही. सांगतात, " मेडिटेरेनियन आहार घेतल्याने स्तनाचा कर्करोग, स्मृतिभ्रंश, नैराश्य, मधुमेह, खराब कोलेस्ट्रॉल वाढणे आणि स्मरणशक्ती कमी होणे इत्यादींचा धोका कमी होऊ शकतो. मेडिटेरेनियन आहार हाडांचे आरोग्य सुधारतात आणि वजन कमी करण्यास मदत करतात."

ॲस्टर आरव्ही हॉस्पिटलच्या न्यूट्रिशनिस्ट सौमिता बिस्वास सांगतात, " नवीन संशोधनानुसार, वनस्पती-आधारित मेडिटेरेनियन आहार घेणाऱ्या महिलांचा अचानक मृत्यूचा धोका २३ टक्क्यांनी कमी होत आहे. अमेरिकेतील २५ हजार महिलांवर केलेल्या अभ्यासात असे दिसून आले की, या आहारामुळे कोलेस्ट्रॉल आणि लठ्ठपणा कमी करण्यास मदत होते."

मेडिटेरेनियन आहार

ऑलिव्ह ऑईल हे मेडिटेरेनियन आहारातील फॅट्सचा प्रमुख स्त्रोत आहे. या आहारात प्रामुख्याने बिया, फळे, भाज्या आणि शेंगा इत्यादींचा समावेश होतो.



"आहारात अंडी, दुग्धजन्य पदार्थांऐवजी ओमेगा-३ फॅटी ॲसिड समृद्ध मासे खाण्याची शिफारस केली जाते, पण त्याचे सेवन मर्यादित असावे", असे वीणा व्ही. सांगतात. याशिवाय ऑलिव्ह ऑईल, लसूण आणि कधीकधी टोमॅटोचा वापर करून जेवण तयार करू शकता.

भारतीय आहार

कडधान्ये, भाज्यांचा मेडिटेरेनियन आहारात समावेश करून आरोग्याचा फायदा केला जाऊ शकतो. ब्राउन राइस, गव्हाच्या पीठाच्या पोळ्या खाव्यात.

लाल मांसचे मर्यादित सेवन करावे; तसेच मासे, दही आणि पनीर कमी प्रमाणात खावे. "भारतीय लोक ओट्स किंवा बेसन चिल्ला, चणा चाट, भाजलेले चिकन आणि ब्राउन राइस खाऊ शकतात", असे सौमिता बिस्वास सांगतात.

कोणी आहार घेऊ नये?

वीणा व्ही. सांगतात, "काजू किंवा कोणत्याही विशिष्ट प्रकारच्या सीफूडची ॲलर्जी असलेल्या लोकांनी हा आहार घेऊ नये. याशिवाय, मूत्रपिंडाचा आजार असलेल्या लोकांनी पोटॅशियमयुक्त फळे आणि भाज्यांचे सेवन मर्यादित करावे."

त्या पुढे सांगतात की, ऑलिव्ह ऑईल आणि नट्समध्ये कॅलरी भरपूर प्रमाणात असतात, याचे दैनंदिन आहारामध्ये सेवन न केल्यास वजन वाढू शकते.

## राशि भविष्य

**मेष** — स्वत:बद्दल छान वाटावे अशा गोष्टी घडण्याचा एकदम अद्भूत दिवस. धनाचे आगमन आज तुम्हाला बऱ्याच आर्थिक परिस्थितीतून दूर करू शकते. आपण ज्यांच्या बरोबर राहता त्यांच्यासाठी तुम्ही खुप काही करत असाल तरी ते तुमच्यावर नाराज असतील.

**वृषभ** — आपल्या पत्नीच्या कामात ढवळाढवळ करू नका, त्याचा तिला राग येऊ शकतो. स्वत:च्या कामाशी मतलब ठेवा. तिच्या कामात कमीतकमी हस्तक्षेप करा, अन्यथा परावलंबित्व येऊ शकते. ज्यांची किंमत वाढतच जाणार आहे अशा वस्तूंच्या खरेदीसाठी आजचा दिवस शुभ आहे.

**मिथुन** — आरोग्य चांगले राहील. चंद्राच्या स्थितीमुळे आज तुमचे धन व्यर्थ खर्च होऊ शकते. जर तुम्हाला धन संचय करायचे आहे तर, तुम्ही आपल्या जीवनसाथी किंवा माता-पिता सोबत या बाबतीत बोलू शकतात. मित्रांकडून सायंकाळी एखादा रोमांचक प्लॅन आखल्यामुळे आजचा दिवस खूपच सुंदर असेल.

**कर्क** — दु:खात असलेल्या व्यक्तीला मदत करून तुम्ही ऊर्जा मिळवा. इतरांच्या उपयुक्त ठरत असेल तर मदत करणे हेच संयुक्तिक आहे नाहीतर नश्वर देहाचा उपयोग तो काय ही बाब लक्षात ठेवा. तुम्ही जर अधिक धनप्राप्तीची अपेक्षा करत असाल तर सुरक्षित अशाच आर्थिक योजनांमध्ये पैसे गुंतवा.

**सिंह** — आपल्या वजनावर लक्ष ठेवा, अतिखाण्यात आनंद मानू नका. आज या राशीतील काही बेरोजगार लोकांना नोकरी मिळू शकते ज्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारेल. तुमच्या प्रतिष्ठेमध्ये आणखी मानाचा तुरा खोवला गेल्यामुळे तुमच्या कुटुंबातील सदस्यांचे नीतीधैर्य उंचावेल.

**कन्या** — निव्वळ मजा, आनंद तुम्ही लुटू शकाल - कारण आयुष्य संपूर्ण मजेत घालवणे हाच तुमचा विचार असतो. तुमचा कुणी जुना मित्र आज व्यवसायात नफा मिळवण्यासाठी तुम्हाला सल्ला देऊ शकतो जर तुम्ही हा सल्ला अमलात आणला तर, तुम्हाला धन लाभ नक्कीच होईल.

**तूळ** — अत्यंत व्यस्त वेळापत्रकातदेखील आपले आरोग्य चांगले असेल. तुमचे काही जुने आजार आज तुम्हाला चिंतीत करू शकतात. ज्यामुळे तुम्हाला हॉस्पिटल ही जावे लागू शकते आणि तुमचे बरेच धन ही खर्च होऊ शकते. आपल्या भावाला परिस्थिती नियंत्रणाखाली ठेवण्यासाठी मदत करा.

**वृश्चिक** — मच्या संशयी स्वभावामुळे तुम्हाला पराभवाला सामोरे जावे लागेल. आजचा दिवस जगून घेण्याच्या आणि करमणुकीवर अति खर्च करण्याच्या आपल्या स्वभावाचे परीक्षण करा जे आपली परिस्थिती समजू शकतात आणि गरज ओळखू शकतात अशा जवळच्या मित्राबरोबर बाहेर फिरायला जा.

**धनु** — आज तुम्ही करमणुकीत रमाल. क्रीडा प्रकार आणि मैदानावरील स्पर्धेमध्ये सहभागी व्हाल. आकर्षक वाटणा-या योजनेत गुंतवणूक करण्यापूर्वी वरवर विचार न करता त्याच्या मूळाशी जा. गुंतवणूक करण्यापूर्वी आणि कोणताही शब्द देण्यापूर्वी तज्ञांशी बोलून घ्या.

**मकर** — तुमचे उल्हसित मन तुम्हाला योग्य ती ऊर्जा पुरवेल आणि आपणास आत्मविश्वास मिळवून देईल. आपल्या रागावर नियंत्रण ठेवा आणि ऑफिस मध्ये सर्वांसोबत चांगल्या प्रकारे व्यवहार करा जर तुम्ही असे केले नाही तर, तुमची नोकरी जाऊ शकते आणि तुमची आर्थिक स्थिती खराब होऊ शकते.

**कुंभ** — धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. तुम्ही जर अधिक धनप्राप्तीची अपेक्षा करत असाल तर सुरक्षित अशाच आर्थिक योजनांमध्ये पैसे गुंतवा. तुमच्या 'चलता है' भूमिकेमुळे आणि विचित्र वागणुकीमुळे तुमच्यासोबत राहणारी व्यक्ती त्रासून जाईल, अस्वस्थ होईल.

**मीन** — परिस्थितीवर तुमचे नियंत्रण आले की तुमची चिंता नाहिशी होईल.साबणाच्या फुग्याला स्पर्श करताच तो जसा फुटून जातो तसेच हे असल्याचे तुमच्या लक्षात येईल व्यापाऱ्यांना आज व्यापारात घाटा होऊ शकतो आणि आपल्या व्यवहाराला उत्तम बनवण्यासाठी तुम्हाला पैसा खर्च लागू शकतो.

# पावसाळ्यात मध्य रेल्वेची नेरळ-अमन लॉज सेवा बंद, माथेरान – अमन लॉज शटल सेवा चालवणार



● मुंबई : माथेरानची राणी अशी ओळख असलेली, नेरळ – माथेरानदरम्यान धावणारी मिनी ट्रेन पर्यटकांचे खास आकर्षण आहे. पावसाळ्यात येथील निसर्गाचे दर्शन घेण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने येथे येतात. मात्र, पावसाळ्यात नेरळ – माथेरान नॅरो गेज मार्गावरील नेरळ – अमन लॉज विभागादरम्यानची नियमित प्रवासी सेवा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. ही सेवा ८ जून ते १५ ऑक्टोबरपर्यंत बंद असणार आहे. त्यामुळे प्रवाशांसाठी केवळ माथेरान – अमन लॉजदरम्यानची शटल सेवा सुरू ठेवण्यात येणार आहे.

माथेरान-अमन लॉज शटल सेवा (दैनंदिन)

माथेरान येथून रोज सकाळी ८.२०, सकाळी ९.१०, सकाळी ११.३५, दुपारी २, दुपारी ३.१५, सायंकाळी ५.२० वाजता सुटेल. ही गाडी अमन लॉज येथे अनुक्रमे सकाळी ८.३८, सकाळी ९.२८, सकाळी ११.५३, दुपारी २.१८, दुपारी ३.३३, सायंकाळी ५.३८ वाजता पोहचेल.

अमन लॉज-माथेरान शटल सेवा (दैनंदिन)

अमन लॉज येथून रोज सकाळी ८.४५, सकाळी ९.४५, दुपारी १२, दुपारी २.२५, दुपारी ३.४०, सायंकाळी ५.४५ वाजता सुटेल आणि माथेरान येथे अनुक्रमे सकाळी ९.०३, सकाळी ९.५३, दुपारी १२.१८, दुपारी २.४३, दुपारी ३.५८, सायंकाळी ६.०३ वाजता पोहचेल.

शनिवार – रविवारी विशेष गाडी माथेरान सकाळी १०.०५, दुपारी १.१० वाजता सुटेल. ही गाडी अमन लॉज येथे सकाळी १०.२३ दुपारी १.२८ वाजता पोहचेल. तसेच अमन लॉज येथून विशेष गाडी सकाळी १०.३०, दुपारी १.३५ वाजता सुटेल आणि माथेरान येथे अनुक्रमे सकाळी १०.४८, दुपारी १.५३ वाजता पोहचेल.

सोमवारी – शुक्रवारदरम्यान विशेष गाडी अमन लॉज येथून सकाळी १०.२२ वाजता सुटेल आणि माथेरान येथे सकाळी १०.४४ वाजता पोहचेल. तसेच माथेरान येथून दुपारी १२.२५ वाजता सुटेल आणि अमन लॉज येथे दुपारी १२.४३ वाजता पोहचेल.

सर्व शटल सेवा तीन द्वितीय श्रेणी, एक प्रथम श्रेणी डब्बा आणि २ द्वितीय श्रेणी कम लगेज व्हॅनसह चालतील.

## गोरेगाव – मुलुंड जोडरस्ता प्रकल्पाआड येणारी बांधकामे हटवली, प्रकल्पाच्या कामाला वेग



मुंबई : गोरेगाव – मुलुंड जोडरस्ता प्रकल्पाआड येणारी मालाडमधील ५१ बांधकामे पालिकेच्या पी उत्तर विभागाने शुक्रवारी कारवाई करून हटवली. त्यामुळे या प्रकल्पाला वेग येणार आहे. तसेच मालाडमधील वाहतूक समस्या सोडवण्यासही मदत होणार आहे. पूर्व आणि पश्चिम उपनगरांना जोडणारा गोरेगाव मुलुंड जोडरस्ता मुंबई महानगरपालिकेच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक आहे. सुमारे १२.२ किमी लांबीचा हा मार्ग चार ते पाच विभागातून जातो. या मार्गावर अनेक ठिकाणी बांधकामे, अनधिकृत बांधकामे असल्यामुळे ती टप्प्याटप्प्याने हटविण्यात येत आहेत. याच कारवाईचा भाग म्हणून शुक्रवारी गोरेगांव – मुलुंड जोडरस्ता रुंदीकरणात बाधित होत असलेली एकूण ५१ बांधकामे पी उत्तर विभागाने हटवली. या ५१ बांधकामांमध्ये सात निवासी व ४४ अनिवासी बांधकामांचा समावेश होता. परिमंडळ ४चे उपायुक्त विश्वास शंकरवार, पी/ उत्तर विभागाचे सहाय्यक आयुक्त किरण दिघावकर यांनी ही कारवाई पार पाडली.

# टोमॅटोचा भाव वधारला, किरकोळ बाजारात दर ८० रुपये किलोवर



● पुणे : किरकोळ बाजारात टोमॅटोचे दर ८० रुपये प्रति किलोवर गेले आहेत. आठवडाभरात दरात प्रतिकिलो ४० रुपयांनी वाढ झाली आहे. राज्यात यंदा लागवडीत ३० टक्क्यांनी वाढ झाली होती. पण, वाढलेले तापमान आणि रोगांच्या प्रादुर्भावामुळे उत्पादनात ६० टक्क्यांपर्यंत घट झाली आहे. जुलैअखेरपर्यंत दर चढेच राहण्याचा अंदाज आहे.मागील आठवड्यात किरकोळ बाजारात टोमॅटोचे दर प्रतिकिलो ४० रुपयांवर होते. शुक्रवारी (७ जून) पुण्यात किरकोळ बाजारात टोमॅटोचे दर ८० रुपये किलोंवर गेले आहेत. आठ दिवसांत दरात प्रतिकिलो ४० रुपयांची वाढ झाली आहे. सध्या बाजारात नारायणगाव (पुणे), संगमनेर (नगर), कळवण (नाशिक) आणि बारामती, फलटण परिसरातून टोमॅटो बाजारात येत आहे.

राज्यात फेब्रुवारी, मार्च, एप्रिल या काळात सरासरीच्या २५ ते ३० टक्क्यांनी टोमॅटो लागवडी वाढल्या होत्या. पण, तापमानवाढीमुळे टोमॅटोचे पीक अनेक भागात वाया गेले आहे. सरासरी ३८ अंश सेल्सिअसच्या वर तापमान गेल्यानंतर झाडांची वाढ खुंटते. पानांचा आकार वाढत नाही, फुले कमी येतात. फळधारणा होण्यापूर्वीच फुले गळून पडतात. फळधारणा कमी होते. टोमॅटोचा आकार वाढत नाही. टोमॅटो लहान राहतात. यंदा टोमॅटोउत्पादक भागात तापमान सरासरी ४२ ते ४५ अंश सेल्सिअसवर गेले होते. त्यामुळे उत्पादनात सरासरी ६० टक्क्यांपर्यंत घट झाली आहे.

### दक्षिणेत तापमानाचा फटका

पावसाळ्याच्या सुरुवातीस दक्षिणेतून म्हणजे आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणातून राज्यात टोमॅटोची आवक होते. यंदा वाढलेल्या तापमानामुळे दक्षिणेतील टोमॅटो लागवडीवर लिपकल, टास्पो या विषाणूसह अन्य विषाणू आणि रोगांचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव झाला आहे. त्यामुळे दक्षिणेकडे टोमॅटोचा तुटवडा निर्माण होऊन किमती भडकल्या आहेत. त्यामुळे दक्षिणेकडून देशाच्या अन्य भागांत टोमॅटो विक्रीसाठी जाणे थांबले आहे. चांगला दर मिळत असल्यामुळे गुजरात, मध्य प्रदेशातून बेंगळुरू, हैदराबादला टोमॅटो जात आहे. परिणामी राज्यात टोमॅटोचा तुटवडा निर्माण झाला आहे. सध्या दक्षिणेत टोमॅटो महाग झाला आहे. तुलनेने पंजाब, हिमाचल प्रदेशातील टोमॅटो दिल्लीत येत असल्यामुळे दिल्लीत टोमॅटो १५ ते २० रुपये किलोंवर आहे.

# विविध बँकांमध्ये खाते उघडून फसवणारी टोळी अटकेत, ५० बँक खात्यांद्वारे २० कोटींची फसवणूक




● पिंपरी : ऑनलाइन टास्क देऊन फसवणूक करणारी आणि पिंपरी-चिंचवड, पुणे शहरातील रहिवाशांची विविध बँकांमध्ये खाती उघडून त्या खात्यांची माहिती सायबर चोरट्यांना उपलब्ध करून देणाऱ्या टोळीला पिंपरी-चिंचवड पोलिसांनी अटक केली. खातेधारकाला प्रत्येकी दोन हजार रुपये देऊन खाते वापरले असून, ५० खात्यांद्वारे २० कोटींची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे.

अल्ताफ मेहबूब शेख (वय २४, जुनी सांगवी), मनोज शिवाजी गायकवाड (२३), हाफिज अली अहमद शेख (दोघे रा. दापोडी), अनिकेत भाऊराव गायकवाड (वय २२, रा. नवी सांगवी), पवन विश्वास पाटील (वय २२, रा. पिंपरी), चैतन्य संतोष आबनावे (वय २१), सौरभ रमेश विश्वकर्मा (वय २३, दोघे रा. पिंपळे गुरव) आणि कृष्णा भगवान खेडकर (वय २७, रा. बीड) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

रावेत येथील एका व्यक्तीला फेब्रुवारीत समाजमाध्यमातील व्हॉट्सॲपवर अर्धवेळ नोकरीची लिंक आली होती. ती उघडल्यानंतर ते एका टेलिग्राम समूहात आपोआप समाविष्ट झाले. टास्क खरेदी करून पूर्ण केल्यास दीड हजार रुपये नफा मिळेल, असे सांगितले. समूहातील इतर सदस्यांनी मिळविलेल्या नफ्याची माहिती टाकली. त्यामुळे त्यांनी ३३०० रुपयांना टास्क खरेदी केले आणि ते पूर्ण केल्याने ५०० रुपये नफा दाखविण्यात आला. मात्र, गुंतवणूक, तसेच नफ्याची रक्कम न मिळाल्याने देहूरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्याच वेळी कर्नाटक बँकेचे पिंपरी शाखेच्या व्यवस्थापकांनी बँकेमध्ये ३४ पेक्षा अधिक खाती दोन महिन्यांत उघडण्यात आले असून, त्यामध्ये संशयास्पद व्यवहार होत असल्याचे पोलिसांना कळविले होते. खाते उघडणारे आणि खाते उघडण्यास लावणारे शहरातील असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

कर्नाटक बँकेतील खातेधारक अल्ताफ याने मनोज आणि अनिकेतच्या सांगण्यावरून बँकेत दोन खाती उघडली. ती खाती मनोजला देऊन त्यापोटी चार हजार रुपये घेतल्याचे सांगितले. मनोजने ही खाती हाफिजला सायबर फसवणुकीसाठी दिल्याचे आणि त्या बदल्यात प्रत्येक खात्यासाठी पाच हजार रुपये घेतल्याचे कबूल केले. पवन याने चैतन्यच्या सांगण्यावरून खाते उघडले असून, त्या बदल्यात दोन हजार रुपये घेतले. चैतन्यने हे खाते सौरभला दिले. त्यापोटी दीड हजार रुपये घेतले. सौरभने ही खाती कृष्णाला दिली. त्या बदल्यात प्रत्येक खात्यासाठी पाच हजार रुपये घेतल्याचे निष्पन्न झाले.

या आरोपींनी खातेधारकाला प्रत्येकी दोन हजार रुपये देऊन त्यांच्या नावावर कर्नाटक बँक, फेडरल, इक्विटास आणि साउथ इंडियन बँकांमध्ये खाती उघडली. खातेधारकांबाबत पोलिसांचा तपास सुरू असून, किरण आणि हाफिज ज्यांना खाते देत होते, त्यांचा शोध सुरू आहे. ५० पेक्षा अधिक बँक खात्यांद्वारे १६ तक्रारी राज्यात प्राप्त झाल्या आहेत. या खात्यांद्वारे २० कोटींपेक्षा जास्त रकमेची फसवणूक झाल्याचे तपासात निष्पन्न झाले. आरोपींना फेडरल बँकेची खाते उघडून देणाऱ्यांची चौकशी सुरू असून, सायबर सेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैभव शिंगारे तपास करत आहेत.

# सरखेल कान्होजीआंग्रे समाधीस्थळ सुशोभीकरण कामाला ब्रेक



अलिबाग - स्वराज्यातील आरमाराचे प्रमुख सरखेल कान्होजी आंग्रे यांचे अलिबाग शहरात समाधी स्थळ आहे. आंग्रे यांच्या समाधी स्थळ परिसराचे सुशोभीकरण काम अलिबाग नगर परिषदेच्या माध्यमातून सुरू होते.या कामाबाबत पुरातत्त्व विभागाने काही प्रश्न उपस्थित केल्यामुळे हे काम थांबवले आहे. अडीच महिन्यापासून पुरातत्त्व विभागाच्या हस्तक्षेपामुळे हे काम ठप्प आहे. उपस्थित केलेल्या प्रश्नांची निरसन करून पुढील काम सुरू होईल असे मुख्याधिकारी अंगाई साळुंखे यांनी म्हटले आहे.

२१ जानेवारीला राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे आमदार महेंद्र दळवी माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक,आग्रे घराण्याचे वंशज रघुजीराजे आंग्रे यांच्या उपस्थितीत आंग्रे यांच्या समाधीस्थळ परिसर सुशोभीकरणाच्या कामाचा शुभारंभ केला होता.संरक्षक भिंत आणि आरमारी नौके ची प्रतिकृती उभारणीचे काम हाती घेतले होते. प्रादेशिक पर्यटन योजनेतून दोन कोटी सुशोभीकरण कामासाठी मंजूर झाले आहेत.अजून तीन कोटीचा निधीची गरज असून पाच कोटी रुपये खर्च होणार आहे. अलिबाग हा पर्यटनासाठी उत्तम तालुका आहे. मात्र अलिबाग मध्ये येणारे बहुतांश पर्यटक हे समुद्र पर्यटन करून माघारी फिरतात मात्र सर्कल कान्होजी आंग्रे यांच्या समाधी स्थळाला भेट देत नाहीत. त्यामुळे पर्यटनाच्या दृष्टीने हे स्थळ दुर्लक्षित राहिले आहे. आंग्रे समाधी स्थळाला ही पर्यटकांनी आवर्जून भेट द्यावी. यासाठी परिसराचे सुशोभीकरणाचे काम सुरू केले आहे .मात्र त्याला पुरातत्त्व विभागाने खोडा घातला आहे .

समाधी स्थळ उद्यानाच्या प्रवेशद्वारावर भव्य अशी गलबताच्या प्रतिकृतीची उभारणी करणे,किल्ल्याच्या प्रतिकृती उभारणे दीपमाळाची उभारणी करणे, कान्होजी राजे आंग्रे यांच्या जीवनावरील मुरल्स तयार करणे यासाठी लागणारी आवश्यक बांधकामे ही कामे या योजनेअंतर्गत केली जाणार आहेत. जानेवारी या कामाला सुरुवात केली होती.

त्यासाठी आवश्यक निविदा प्रक्रिया तांत्रिक मान्यताही प्राप्त झाल्या. त्यामुळे काम पूर्ण झाल्यानंतर आंग्रे समाधी स्थळाकडे पर्यटकही आकर्षित होतील .मात्र पुरातत्त्व विभागाने काही प्रश्न उपस्थित केल्याने हे काम थांबविले आहे.

■ "सारखे कान्होजी आंग्रे समाधी स्थळाचे सुशोभीकरण काम सुरू झाले होते .परंतु पुरातत्त्व विभागाने काही कामाबाबतीत शंका उपस्थित केल्या आहेत .त्यामुळे काम थांबले आहे. पुरातत्त्व विभागाच्या शंकांचे निरसन केले जात आहे. व लवकरच काम पुन्हा सुरू होईल

**- अंगाई साळुंखे**
**मुख्याधिकारी अलिबाग नगर परिषद**

## Pune Sadashiv Peth fire | 'No fire safety measures, no system to alert students': Hosteler slams negligence



● Pune - Rahul Kulkarni (40 to 45-years-old), who was the office assistant of the institute and was sleeping in his room on the ground floor where the short circuit occurred. As per Shekhar, a survivor and caretaker of the five-storey building, the fire began due to a short circuit on the ground floor, quickly spreading throughout the building. "There were a total of 48 girls staying in the building who were successfully evacuated by 2 am through the emergency door," he said.

When asked about Kulkarni, Shekhar said he was unable to contact him as he was stuck and busy helping girls evacuate.Bhagyashree, a student and hostel resident, who dialed the emergency number, said that there was no system in place to alert students about the fire incident. She was among the last ten girls to be evacuated. "There were no safety measures and no hostel warden present. Many girls use LPG cylinders, and if the fire had reached the fourth and fifth floors, the situation might have been different," she added. Bhagyashree demanded action against institute authorities who were negligent, including the hostel guard who was absent during the incident.

Dhirendra Pathak, a watchman from Nishita Tower which is located in front of the building, said that two boys from his building had alerted the watchman of the fire, but he ran out of the building due to fear.

"Rahul sir used to stay on the first floor of the building in the corner room. His body was recovered by the medical team around 2:30 am after the fire was brought under control," Pathak added.

Sameer Shah, the brother-in-law of Nilay Mehta, owner of the institute and building, expressed his shock and said that he had come down from Nashik to handle the situation. He said he was mentally exhausted dealing with the situation, but was thankful that all the students were evacuated on time.

## Rahul Gandhi to 'think and decide' even as CWC 'unanimously' asks him to become Leader of Opposition



● Delhi - As the Congress Working Committee met today to decide on the Leader of Opposition's post, several party leaders were seen pushing for Rahul Gandhi's name. While the final call is yet to be made, sources say that Rahul has said he "will think it over and take a decision". Congress leader K C Venugopal said the CWC "unanimously requested" him to take up the role. In the meeting a day ahead of Narendra Modi taking oath for the third term, party chief Mallikarjun Kharge spoke about the 2024 Lok Sabha results and said the people have given a "befitting reply to dictatorial forces" by reposing faith in the grand old party.

Later in the day, the the Congress Parliamentary Party (CPP) with newly-elected MPs will also hold a meeting. The party chairperson post is currently held by Sonia Gandhi. She is now in the Rajya Sabha after deciding not to contest from the traditional Gandhi family bastion of Uttar Pradesh's Rae Bareli, from where her son and senior Congress leader Rahul Gandhi won.


What's happening on the NDA front? Narendra Modi's new council of ministers is expected to be finalised by the time of the swearing-in ceremony at 7.15 pm on Sunday evening. Hot parleys seem to be in progress with BJP party chief J P Nadda reaching leader Amit Shah's residence in New Delhi this

## 3 dead, 6 injured as fire breaks out in factory in Delhi's Narela

● Delhi - The police control room (PCR) received a call at 3.35 am reporting the blaze with no initial information on people being trapped inside. While the Delhi Fire Services rushed to the spot with 16 fire tenders, responders from Narela Industrial Area police station arrived at the scene to find the factory engulfed in flames.The police control room (PCR) received a call at 3.35 am reporting the blaze with no initial information on people being trapped inside. While the Delhi Fire Services rushed to the spot with 16 fire tenders, responders from Narela Industrial Area police station arrived at the scene to find the factory engulfed in flames.

Three people died and six others were injured after a fire broke out at a pulses processing factory in Delhi's Narela Industrial Area early Saturday morning. The police said that a gas leak in one of the pipelines caused the fire which led to overheating of the compressor and a blast.

The police control room (PCR) received a call at 3.35 am reporting the



blaze with no initial information on people being trapped inside. While the Delhi Fire Services rushed to the spot with 16 fire tenders, responders from Narela Industrial Area police station arrived at the scene to find the factory engulfed in flames.

Nine people were rescued and transported to SHRC Hospital, Narela, but three were declared dead on arrival. The deceased were identified as Shyam (24), Ram Singh (30), and Beerpal (42).

Six others who sustained injuries were referred to Safdarjung Hospital. While Pushpender (26), Akash (19), Mohit Kumar (21), Monu (25), and Lalu (32) suffered burn injuries, Ravi Kumar (19) suffered a simple injury from a brick, officials said.

# राज्यपालांच्या हस्ते प्लास्टिक उद्योगातील निर्यात पुरस्कार प्रदान

## प्लास्टिक उद्योगाने पर्यावरण रक्षणासाठी सक्रिय भूमिका बजावावी : राज्यपाल

● मुंबई, प्रतिनिधी :

विसाव्या शतकात शोध लागलेली प्लास्टिक बहुगुणी वस्तू असून आज दैनंदिन जीवनापासून अनेक क्षेत्रांत प्लास्टिकचा वापर अनिवार्य झाला आहे. भारतीय प्लास्टिक उद्योगाने जगातील अनेक बाजारपेठा काबीज केल्या असून या उद्योगाने संशोधन, नाविन्यता व उत्कृष्टतेच्या माध्यमातून 'ब्रँड इंडिया' निर्माण करावा, असे आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी येथे केले.

भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या अधिनस्त असलेल्या प्लास्टिक निर्यात प्रोत्साहन परिषदेतर्फे देण्यात येणारे 'प्लास्टिक निर्यात उत्कृष्टता पुरस्कार' राज्यपाल बैस यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. 7 जून) नेसको, गोरेगाव मुंबई येथे प्रदान करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी सुप्रीम इंडस्ट्रीजचे अध्यक्ष एम.




पी. तापडिया, यांना जीवन गौरव पुरस्कार देण्यात आला. कौन्सिलचे माजी अध्यक्ष अरविंद गोयंका यांना विशेष सन्मान देण्यात आला. एकूण 75 प्लास्टिक निर्यातदारांना पुरस्कार' देण्यात आले.

मध्य पूर्वेतील युद्धजन्य स्थितीमुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर कमी होत असताना भारताची अर्थव्यवस्था तेजीने वाढत असल्याचे राज्यपालांनी सांगितले. प्लॅस्टिक उद्योग 50 लाखांहून अधिक लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार देत असल्याचे नमूद करून प्लास्टिक एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलने राज्यातील विविध विद्यापीठांशी सहकार्य स्थापित करावे तसेच विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील उद्योग आणि रोजगाराच्या संधींबद्दल अवगत करावे, असे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले.

जगातील अनेक प्रगत देशांच्या तुलनेत भारताचा संशोधन आणि नावीन्यतेवरील खर्च खूपच कमी आहे असे सांगून प्लास्टिक उद्योगाने संशोधन आणि नवनिर्मितीवर अधिक भर द्यावा, असे राज्यपालांनी सांगितले.

प्लास्टिक उद्योगाने पर्यावरण रक्षणासाठी सक्रिय भूमिका बजावावी तसेच प्लास्टिकचा पुनर्वापर आणि प्लास्टिक कचरा व्यवस्थापन याबाबत जागरूकता निर्माण करावी, असे राज्यपालांनी सांगितले.

कार्यक्रमाला प्लास्टिक निर्यात प्रोत्साहन परिषदेचे अध्यक्ष हेमंत मिनोचा, उपाध्यक्ष विक्रम भादुरिया व कार्यकारी संचालक श्रीबाश दासमोहपात्रा, प्लास्टिक क्षेत्रातील उद्योजक, आंतरराष्ट्रीय खरीददार व निर्यातदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बेलापूर विभागातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई

● नवी मुंबई, प्रतिनिधी :

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अे विभाग बेलापूर कार्यालया अंतर्गत से-14, दिवाळे गांव नवी मुंबई श्री. पांडुरंग कोळी, घर क्र.611, सेक्टर-14, दिवाळे गाव, नवी मुंबई येथे अनधिकृत बांधकाम सुरु असून सदरच्या बांधकामासाठी नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे काम सुरु केले होते.

सदर अनधिकृत बांधकामास अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 54 अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविने आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते.

सदर श्री. पांडुरंग कोळी, घर क्र.611, सेक्टर-14, दिवाळे गाव, नवी मुंबई येथीलअनधिकृत बांधकाम अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करुन करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले.

तसेच पंचशिल नगर ,से-20,सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई येथे अनधिकृतपणे झोपड्या उभारण्यात आलेल्या होत्या. आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या आदेशान्वये व मा. उप आयुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनानुसार अे-विभाग बेलापूर कार्यालयाचे




श्री. शशिकांत तांडेल (सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी) यांच्या नियंत्रणाखाली सदर पंचशिल नगर , से-20, सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई येथील 93 अनधिकृत झोपड्या अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करुन निष्कासित करण्यात आल्या आहेत. या धडक मोहिमेसाठी अे विभाग कार्यालय अगंतर्गत बेलापूर मधील अधिकारी/ कर्मचारी श्री. मयुरेश पवार (कनिष्ठ अभियंता), श्री. स्वप्निल तारमळे (वरिष्ठ लिपिक), श्री. धिरेण भोईर (मा.नो.लि) मजूर 28, गॅसकटर-02, इलेक्ट्रीक हॅमर – 05, जे.सी.बी - 01, पिकअप-01 तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलिस तैनात होते.

यापुढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# सीबीआयचे लालूप्रसाद यांच्याविरोधात आरोपपत्र




● नवी दिल्ली, प्रतिनिधी :

नोकऱ्यांसाठी जमिनी घोटाळा प्रकरणात सीबीआयने शुक्रवारी माजी रेल्वेमंत्री लालूप्रसाद यादव यांच्यासह अन्य ७७ जणांविरोधात आरोपपत्र दाखल केले. यादव रेल्वेमंत्री असताना रेल्वेच्या विविध विभागांमध्ये अपात्र उमेदवारांना नोकऱ्या देण्याच्या मोबदल्यात त्यांच्या कुटुंबीयांनी कथितरित्या जमिनी मिळवल्याचा आरोप आहे.

या घोटाळ्याचा तपास केल्यानंतर सीबीआयने विशेष न्यायाधीशांसमोर तिसरे आणि अखेरचे आरोपपत्र ठेवले. या ७८ आरोपींमध्ये लालूप्रसाद यादव, त्यांची पत्नी राबडीदेवी, मुलगा तेजप्रताप यादव, मुलगी हेमा यादव, माजी ओएसडी भोला यादव आणि लालूप्रसाद यादव यांचे माजी कर्मचारी यांच्या नावांचा समावेश आहे. यापैकी तेजप्रताप यादव याच्याविरोधात पहिल्यांदाच आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

या यादीत एकूण २९ रेल्वे अधिकारी, ३९ उमेदवार आणि सहा अन्य व्यक्तींची नावे आहेत. या सर्वांविरोधात फसवणूक आणि खोट्या सह्या करण्यासह भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या विविध तरतुदींअंतर्गत आरोप निश्चित करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी पात्रतेसाठी बनावट शैक्षणिक प्रमाणपत्रेही सादर केली होती.

# मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार; जिरीबाम जिल्ह्यात अतिरेक्यांनी पोलीस चौकीसह अनेक घरे जाळली

● मणिपूर, प्रतिनिधी :

गेल्या काही महिन्यांपासून मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. त्यामुळे तेथे कायम तणावाचे वातावरण पाहायला मिळत आहे. हिंसाचाराच्या घटनांमध्ये अनेक लोकांचा मृत्यूही झाला होता. त्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी लष्करालाही पाचारण करण्यात आलं होतं. त्यानंतर तेथील परिस्थिती हळूहळू नियंत्रणात येत आहे. मात्र, असे असतानाच आता मणिपूरच्या जिरीबाम जिल्ह्यात शनिवारी संशयित अतिरेक्यांनी



पोलीस चौकी जाळल्याची घटना घडली आहे. तसेच काही घरेही जाळले असल्याचे सांगण्यात येत आहे.

अतिरेक्यांनी शुक्रवारी रात्री येथील जिरीबाम जिल्ह्यात एका पोलीस चौकीवर आणि काही घरांवर हल्ला केला. त्यानंतर पोलीस चौकी आणि काही घरांना आग लावली. या घटनेनंतर जिरीबाम जिल्ह्यातील प्रशासन अलर्ट झालं असून या परिसरातील तब्बल २०० पेक्षा जास्त लोकांना मदत करत छावण्यांमध्ये पाठवण्यात आले आहे. दरम्यान, बोटीतून आलेल्या अतिरेक्यांनी हा हल्ला केला असल्याचं सांगण्यात येत आहे. जिरी या पोलीस चौकीला दुपारी आग लावण्यात आली, तर जिरीबाम जिल्ह्याच्या बाहेरील भागात अनेक घरे जाळली आहेत. तर काही ठिकाणी अंधाराचा फायदा घेत हल्ले करण्यात आले आहेत. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्सप्रेसनं दिलं आहे.

राजधानी इंफाळपासून तब्बल २२० किमी अंतरावर असलेल्या लामता खुनो, मोधुपूर भागातही हल्ले झाले आहेत. यानंतर मणिपूर पोलिसांच्या कमांडो तुकडीला शनिवारी सकाळी इम्फाळहून जिरीबाम येथे विमानाने पाठवण्यात आले आहे. दरम्यान, येथील काँग्रेसचे नवनिर्वाचित खासदार अंगोमचा बिमोल अकोइजाम यांनी राज्य सरकारला जिरीबाम जिल्ह्यातील लोकांच्या जिवाचे रक्षण करण्याची विनंती केली.

अकोइजाम पत्रकार परिषदेत म्हणाले, "मी जिरीबामच्या जिल्हा अधिकाऱ्यांशी बोललो आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं आहे की त्या ठिकाणी पोलीस पोहचले असून शहरातील लोकांना सुरक्षा पुरवली जात आहे.

# नरेंद्र मोदींच्या पंतप्रधानपदी निवडीचा नवी मुंबईत जल्लोष

● नवी मुंबई, प्रतिनिधी :

नरेंद्र मोदी यांची देशाच्या पंतप्रधानपदी तिसऱ्यांदा निवड झाली असून याचा जल्लोष नवी मुंबई भाजपा जिल्ह्याच्या वतीने जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी खासदार संजीव नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये साजरा करण्यात आला. वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठ्या संख्येने जमलेले कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी एकमेकांना मिठाई भरवत आनंद व्यक्त केला. संगीताच्या तालावर कार्यकर्त्यांनी नृत्यही केले. शिवाजी चौक यावेळी भारतीय जनता पक्षाच्या झेंड्यांनी बहरून गेला होता. यावेळी प्रतिक्रिया देताना माजी खासदार संजीव नाईक यांनी मोदीजी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी विराजमान होणार असून देशाची सेवा करण्यास सज्ज झाल्याचे सांगितले. आगामी पाच वर्षांमध्ये विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी काम सुरू होईल. मोदीजींच्या नेतृत्वाखालील सरकार आपल्या पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करून पुढील पाच वर्षांची पायाभरणी देखील करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. लोकसभा निवडणुकीमध्ये संविधान बदलणार असल्याचा अपप्रचार विरोधकांनी केला. मोदीजींचे सरकार पुन्हा येणार नाही असा दावा विरोधक करत होते. परंतु तिसऱ्यांदा मोदी सरकार स्थापन होणार आहे, असे सांगून विरोधक आरोप करीत राहतील, सत्ताधारी म्हणून जनतेला दिलेल्या वचनांची पूर्तता करण्याचं काम आम्ही करू.

# पाणी टंचाई खर्चाचे 'मीटर' सुसाट! टँकर पाऊणशेच्या घरात, पावणेआठ कोटी...

● बुलढाणा, प्रतिनिधी :

मृग नक्षत्र लागले असले तरी जिल्ह्यातील पाणी टंचाईचे भीषण संकट कायम आहे. या परिणामी पाणी टंचाई योजनेवरील खर्चाचे 'मीटर' जोराने धावत आहेत. आजवर विविध योजनांवर तब्बल ७ कोटी ७४ लाख रुपये खर्ची झाले आहे. जिल्ह्याच्या पाणी टंचाई कृती आराखड्यात १५७० उपाय योजना प्रस्तावित करण्यात आल्या होत्या.

त्यातील ५९४ योजनांना मंजुरी मिळाली असून ९५ प्रगतीपथावर आहे. ४८४ योजना पूर्ण झाल्या आहेत. त्यावर ७कोटी ७४ लाख रुपये खर्ची झाले आहे. यातील ४ कोटी१३ लाख निधी मिळाला असून ३ कोटी ६१ लाख निधी प्रलंबित आहे.

जिल्ह्यातील साडेतीन लाख ग्रामस्थांची पाणीटंचाईमुळे होणारी



होरपळ आणि भटकंती जूनच्या पहिल्या आठवड्यातही कायम आहे. जिल्ह्यातील टँकरची संख्या ७८ वर गेली आहे. दुर्दैवाने पावसाची दडी अशीच कायम असली तर हा आकडा शंभरी गाठणार असे चित्र आहे. ७ तालुक्यातील ७२ गावांना सध्या ७८ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. चिखली आणि देऊळगाव राजा तालुक्यात प्रत्येकी १४, बुलढाण्यात १६, मेहकर मध्ये १५, सिंदखेडराजा मध्ये १०, मोताळ्यात ७, लोणार मध्ये २ टँकरद्वारे पाणी पुरविण्यात येत आहे.

यामुळे तब्बल २ लाख१८ हजार ४७३ ग्रामस्थांचे बेहाल होत आहे. मागील किमान दोन महिन्यांपासून त्यांना भीषण पाणी टंचाईचे चटके सहन करावे लागत आहे. अनेक गावांना तर डिसेंबर व जानेवारीपासूनच टँकरवर अवलंबून राहण्याची पाळी आली आहे.

### २३९ गावांना खाजगी विहिरींचा आधार

दुसरीकडे २३९ गावांची तहान २८५ खाजगी अधिग्रहित विहिरीद्वारे भागविली जात आहे. देऊळगाव राजा तालुक्यात ५२ चिखली ५३ बुलढाणा २५ मेहकर ५१, मोताळा १८, लोणार ३९ सिंदखेडराजा ३९ तर शेगाव तालुक्यात ८ खाजगी विहीर अधिग्रहित करण्यात आल्या आहे.

### ४७ धरणात १४ टक्केच जलसाठा

दरम्यान जूनच्या पहिल्या आठवड्यात जिल्ह्यातील ४७ लहानमोठ्या धरणात अल्प जलसाठा उरला आहे. मोठ्या ३ धरणापैकी खडकपूर्णा मध्ये केवळ मृत जलसाठाच उरला आहे. यासह पेन टाकळी व नळगंगा या तीन बृहत प्रकल्पात मिळून ११.१८ टक्केच जलसाठा आहे. सात मध्यम प्रकल्पात सरासरी १९ .९४ टक्के तर ३७ लघु प्रकल्पात सरासरी१२.६२ टक्केच जलसाठा शिल्लक आहे.

# महाबळेश्वरचे तोंडे न पाहणाऱ्या पर्यटकांनाही भरावा लागतो कर

● महाबळेश्वर, प्रतिनिधी :

ब्रिटिशांनी महाबळेश्वर हे थंड हवेचे ठिकाण केल्यामुळे या परिसरातील स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार मिळाला आहे त्यांच्या रोजगारामध्ये निश्चितच वाढ व्हावी. यासाठी राज्य शासन तीर्थक्षेत्र व पर्यटन स्थळ म्हणून भरघोस निधी देत आहे. असे असताना काही पर्यटकांना महाबळेश्वर परिसरात व अलीकडे कर भरावा लागत आहे. हा कर नगरपालिकेचा असून यासाठी नेमलेले कर्मचारी चक्क पन्नास रुपये मागून घेत आहेत याबाबत साताराचे जिल्हाधिकारी जितेंद्र ड्युटी यांनी लक्ष द्यावे अन्यथा आंदोलन होण्याची शक्यता आहे.

सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे अनेक देशी -परदेशी पर्यटक, सहली हे प्रतापगड, खेड पोलादपूर व महाड ,तापोळा भागात मोठ्या प्रमाणात गर्दी करू लागलेले आहेत. महाबळेश्वर सारख्या थंड हवेच्या ठिकाणी पर्यटकांची होणारी काही प्रमाणात लूट ही आता




चव्हाट्यावर आलेली आहे. महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद एके काळी पर्यटकांना सुविधा देण्यासाठी नावलौकिक मिळवत होते. आता मधाचे गाव म्हणून मांगर व पुस्तकाचे गाव म्हणून भिलार प्रसिद्धीला पावत असतानाच महाबळेश्वर मध्ये पर्यटकांचा थांबून त्यांच्याकडून महाबळेश्वर नगरपालिकेच्या परिसरातही कर गोळा केला जात आहे. ही बाब आता पर्यटकांना खटकू लागलेली आहे.

सध्या पार्किंगच्या कारणामुळे वेण्णा लेक तलाव ,राजभवन व विविध पॉइंट जुने महाबळेश्वर, प्रतापगड व रस्त्यावरील अनेक ठिकाणी गाडीचा क्रमांक पाहून वाहन कर, पर्यटन कर तसेच आता पावसाचा कर घेण्यास सुरुवात केलेली आहे. अशी तक्रार पर्यटकांनी केलेली आहे.

काही दलाल हे एसी रूमचे हॉटेल दाखवतो .असे सांगून साधा रूम देत असल्याची ही बाब उघडकीस आलेली आहे. यामुळे महाबळेश्वरच्या हॉटेल पेक्षा आजूबाजूच्या परिसरात मिळणारे चांगली सुविधा व माणुसकी तसेच आपुलकीची सेवा मिळत असल्यामुळे महाबळेश्वर मधील हॉटेल व्यवसायिकांवर आता बेकारीची कुऱ्हाड कोसळल्यास आश्चर्य वाटणार नाही .


या ठिकाणी लक्झरी बसेस व चार चाकी वाहने अडवून कर गोळा करण्यासाठी अर्धा तास ते पाऊण तास पर्यटकांची अडवणूक केली जात आहे. दरम्यान, या महाबळेश्वर परिसरात सर्व चार चाकी वाहनांना थांबून कर गोळा केला जात आहे. त्याचा ठेकेदार हा फक्त कर वसूल करणे व मानसिक आणि आर्थिक त्रास देण्यासाठी नेमले आहेत का? पर्यटन वाढीसाठी कोणती ही सुविधा नाही. टोल व कर वसुली करणाऱ्यांना कोणतेही ओळख पत्र नाही. त्यांची भाषा ही दादागिरीची असते. यातून हप्तेबाजीचे दर्शन नक्कीच होते. याबाबत सातारा जिल्हा पालक मंत्री, खासदार , आमदार,जिल्हाधिकारी यांनीच लक्ष घालावे अशी मागणी पुढे आली आहे. महाबळेश्वर - पाचगणी पेक्षा आजूबाजूच्या परिसरात मन शांती व पर्यटन आनंद मिळत असल्याचे काही पर्यटकांनी सांगितले.

# खड्ड्यात साचलेल्या पाण्यात चार मुली बुडाल्या, एकीचा मृत्यू

● पुणे, प्रतिनिधी :

कात्रज-कोंढवा रस्त्यावर खड्ड्यात साचलेल्या पाण्यात चार मुली बुडाल्याची घटना शनिवारी दुपारी घडली. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन मुलींना बाहेर काढले. त्यापैकी एक मुलगी खोल पाण्यात बुडाल्याने तिचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. मुस्कान शिलावत (वय १६) असे मृत्युमुखी पडलेल्या मुलीचे नाव आहे. सरगम शिलावत (वय १५), सेजल शिलावत (वय १३), जानू शिलावत (वय १५) अशी बचावलेल्या मुलींची नावे आहेत.

कात्रज-कोंढवा रस्त्यावर इस्कॉन मंदिरात परिसरात भुयारी मार्गाचे काम सुरू आहे. या भागात चार ते पाच झोपड्या आहेत. तेथे एका खड्ड्यात साचलेल्या पाण्याचा वापर झोपडीतील रहिवासी करतात. मुली तेथे राहायला आहेत. शनिवारी दुपारी बाराच्या सुमारास मुस्कान, सरगम, सेजल, जानू साचलेल्या पाण्यात कपडे धुण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी पाय घसरल्याने चौघी मुली पाण्यात बुडाल्याची माहिती अग्निशमन दलाला तेथील रहिवाशांनी दिली.



या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या कोंढवा अग्निशमन दलाचे केंद्रप्रमुख समीर शेख, समीर तडवी, दशरथ माळवदकर, प्रकाश शेलार, अभिजीत थळकर, विश्वजीत वाघ यांनी घटनास्थळी धाव घेतली. जवानांनी पाण्यात बुडालेल्या मुस्कान, सरगम, सेजल, जानू यांना बाहेर काढले एक मुलगी खोल पाण्यात बुडाली होती. खड्ड्यात चिखल मोठ्या प्रमाणावर होता. नाका तोंडात पाणी गेल्याने मुस्कान बेशुद्ध पडली. तिला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारापूर्वीच ती मरण पावल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या घटनेची माहिती मिळताच कोंढवा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी बेशुद्धावस्थेतील एका मुलीला रुग्णालयात दाखल केले, अशी माहिती अग्निशमन दलाचे केंद्रप्रमुख समीर शेख यांनी दिली.